ॐ श्रीगणेशाय नमः । वैशाखी संकष्टीचें महिमान । ऐकिलें मीं पावन । आतां ज्येष्ठ संकष्टीचें माहात्म्य सांगून । उपकृत मजला करावें ।।१।। दशरथाची प्रार्थना ऐकून । वसिष्ट सांगती त्यास प्रसन्न । निषध देशांत महाभाग नल महान । तेजस्वी शस्त्रास्त्रसंपन्न ।।२।। शास्त्रज्ञ तो रूपवान । तैसाचि होता धनसंपन्न । चतुरंग बलान्वित असून । अन्य भूमिपाल करद त्याचे ।।३।। धर्मनीति न्याययुक्त । स्वयशें त्रैलोक्य भरित । इन्द्रलोकीं विधिलोकांत । कैलासांत चर्चा त्याची ।।४।। विष्णुलोकीं प्रशंसित । धर्मशीलता त्याची समस्त । त्रैलोक्य गमनीं आसक्त । साधुदर्शनीं तत्पर तो ।।५।। देवविप्र अतिथींस पूजित । अंध दीनांसी पाळित । त्याची भार्या दमयंती ख्यात । अप्रतिम रूपयुक्त ।।६।। विशालाक्षी जगमोहिनी । अशक्य तिचे गुणवर्णनीं । पुण्यश्लोक राजा नल स्वजीवनीं । कलीस जिंकी महायश ।।७।। एकदां कलिवश भ्राता जिंकित । द्यूतांत त्या नलराजास हरवित । म्हणोनि नलराजा जात । घोर वनांत त्यायोगें ।।८।। तेथेंही मत्स्यमिषें जणु प्रेरित । नळ दमयंतीस त्यागित । अर्धवस्त्रांत ती हिंडत । जनकसदनीं जावया ।।९।। एकाकिनी दुःखसमायुक्त । दुःखपूर्ण ती नलवर्जित । तीन वर्षे गुप्तरूपांत । वस्त्रार्धानें हिंडे नल ।।१०।। तो धर्मशील राजा कलिपीडित । पाहून नारद तेथ जात । त्यास पाहून राजा लज्जित । कृतांजली प्रणाम करी ।।११।। नारद जाणून त्यास लज्जित । म्हणे लाजूं नको नृपा गत । कर्माची गती विचित्र ऐशीच असत । सावधान चित्तें ऐक आतां ।।१२।। तुझ्या राज्यांत महाभागा व्रत । संकष्टी चतुर्थीचें त्यक्त । म्हणोनि राज्यभ्रष्टता प्राप्त । तुजसी आली ऐसी स्थिति ।।१३।। जरी हें व्रत कार्यारंभांत । महाराजा नर न आचरित । तरी निरर्थक कर्म होत । समस्त त्याचें जगांत ।।१४।। चतुर्वर्ग फलविहीन । झालास त्या व्रताभावें

म्हणून । आता अवश्य करी यत्न । तें व्रत करण्या सिद्धिद ।।१५।। ऐसें बोलून महायोगी सांगत । माहात्म्य नळराजाप्रत । चतुर्थीचें शांतिप्रद पुनीत । ऐकूनि विस्मित नृप झाला ।।१६।। प्रार्थी नारदासी विनीत । गणेश्वर माहात्म्य सांगा मजप्रत । त्याचें भजन करीन मी निश्चित । तेव्हां नारद त्यास सांगे ।।१७।। गणेश्वराचें महिमान । शांतियोग फलप्रद पावन । वर्णन करण्या अशक्य महान । तथापि कांहीं तुज सांगतों ।।१८।। ब्रह्मा विष्णु शंभुशक्ति । सूर्य अमर शेषनागादि जगतीं । कुलदैवत मानून भजती । गणेश्वरासी सदैव ।।१९।। अन्न प्राणादिक ब्रह्में भजती । विशेषें त्या कुलदेवास जगतीं । महावाक्यांदिकांनी स्तविती । सुयोगदासा त्या वेद ।।२०।। सर्वसिद्धिप्रदा वर्तत । वामांगीं त्याच्या प्रकृति अद्भुत । पंच चित्तमयी बुद्धि विलसत । दक्षिणांगीं तयाच्या ।।२१।। स्वानंदांत जयाची वसती । सर्व पूज्य ज्यासी म्हणती । सर्वादी गणनाथ ऐसी ख्याती । अन्तीं एक तोचि राहे ।।२२।। गण समूहरूप असत । बाह्यांतर योगे जगांत । त्यांचा स्वामी गणेश ख्यात । त्यास भज तूं विधानें ।।२३।। ऐसें सांगून षडक्षर मंत्र देत । गणेशाचा त्यास विधियुक्त । नंतर तो अन्तर्धान पावत । गाणेशक महामुनि ।।२४।। नंतर तो नलराजा शार्दूल । हृदय करोनियां निर्मल । गजाननाचें ध्यान अमल । करून मंत्र जपे सतत ।।२५।। आपणासी आपण निंदित । म्हणे कां न केलें संकष्टीव्रत । नंतर कर्कोटक त्यास चावत । देई अद्भुत वस्त्र तयासी ।।२६।। त्या योगें स्वेच्छास्वरूप प्राप्त । विरूप शरीर त्याचें सांप्रत । होऊनिया चित्तीं मुदित । ऋतुपर्णाकडे गेला ।।२७।। पित्याच्या घरीं वसत । दमयंती जी तिच्याकडून नारद । करवित संकष्टीचें व्रत । ज्येष्ठमासीं योगायोगें ।।२८।। तीन वर्षें पूर्ण होत । नलराजा होता गुप्त रूपांत । चतुर्थीच्या पुण्यानें प्राप्त । झालें ज्ञान तयासी ।।२९।।

तदनंतर ऋतुपर्णासी भेटत । आपुल्या श्वशुरांसी तो वंदित । नागवस्त्रानें पुनः घेत । स्वरूप आपुलें नलराजा ।।३०।। दमयंतीसहित जात । श्वशुरासह सेनेसहित । जेव्हां नल स्वनगरांत । भ्राता स्वागत करी त्याचें ।।३१।। नंतर राज्य करी उत्तम । विघ्नहीन तो अभिराम । सर्व प्रजानन सुखधाम । जाहले हृष्टपुष्ट तेव्हां ।।३२।। ऐसा काळ बहुत । नलराजा स्वपुत्रास राज्य देत । सपत्नीक जाऊन वनांत । भजे अविरत गणनायका ।।३३।। अंतीं स्वानंदलोकीं जात । तेथेंच झाला ब्रह्मभूत । नलराजाच्या आज्ञेनें करित । जे जन व्रत संकष्टीचें ।।३४।। तेही शुक्ल कृष्ण चतुर्थी व्रत । करून झाले सुखयुक्त । पुत्रपौत्रादींनी युक्त । रोगवर्जित नराधिपा ।।३५।। अंतीं क्रमानें ते होत । ब्रह्मभूत जन समस्त । ऐसें हें माहात्म्य अद्भुत । ज्येष्ठ संकष्टी व्रताचें ।।३६।। आणखी एक वृत्तान्त । नृपा तुज सांगतों सांप्रत । या व्रताचा प्रभाव असत । वर्णिला त्या घटनेंत ।।३७।। मालव देशीं अंत्यज वसत । एक पापकर्मा अत्यंत । तो ब्राह्मणादींस गांठून वनात । मारून द्रव्य हरण करी ।।३८।। एकाकिनी स्त्री पाहत । तेव्हां तो दुष्ट बलात्कारें खळ तिसी भोगित । परनराचा स्पर्श होता त्यागित । आपुलें शरीर कित्येक सती स्त्रिया ।।३९।। ऐसीं नानाविध पापें करित । जातिदूषण तो अंत्यज सतत । तीं असतीं वर्णनातीत। पापभोगभयें जाण ।।४०।। एकदां तो चांडाळ वनांत । शस्त्रधारी होता हिंडत । पाहून कोणा पुरुषा धावत । हनन त्याचें करावया ।।४१।। तो भयसंकुल पळत । हाहा:कार करी अविरत । प्राणभयें पळे त्वरित। तोच आले राजपुरुष ।।४२।। शस्त्रधारी तेथ आले । राजाचे अधिकारी जे भले । त्यांनी त्यांचे भांडण ऐकलें । कोलाहल तैं बहु झाला ।।४३।। ते राजपुरुष त्या अंत्यजा पकडिती । निर्दयपणें ताडन करिती । बांधून राजासमोर नेती । नृप टाकी बंधनागारीं तया ।।४४।। त्या दिवशींच

दैवयोगें प्राप्त । ज्येष्ठ संकष्टी पुनीत । त्या दिवशीं अन्नविरहित । तुरुंगांत उपास त्यास घडला ।।४५।। दिवस ऐसा त्याचा जात । परी चंद्रोदय होतां रक्षकांप्रत । दया उपजून ते देत । अन्न खावया तयासी ।।४६।। तो दुष्ट होता क्षुधातुर । खाई तें अन्न आतुर । पंचमीस मारिती ठार। राजाज्ञेनें तयासी ।।४७।। तो अंत्यज मरतां होत । व्रत पुण्यबळें ब्रह्मभूत। ऐसेंचि नानाजन लाभत । ऐहिक भोग नानाविध ।।४८।। अंतीं होती ब्रह्मभूत । ऐसें अपार माहात्म्य असत । अशक्य वर्णन करण्या वाटत। परी कथिलें तुज कांहीं ।।४९।। हें ज्येष्ठ संकष्टीचें महिमान । वाचील वा ऐकेल मन लावून । त्यास ईप्सित फळ लाभून । अंतीं मुक्तिलाभ तया ।।५०।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खण्डे गजाननचरिते ज्येष्ठ कृष्ण चतुर्थीचरितवर्णनं नाम चतुर्विंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चोवीसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आषाढ संकष्टीचें व्रत । महिम्यासह सांगा मजप्रत । ऐसें दशरथ प्रार्थित । वसिष्ठ तेव्हां म्हणे त्यासी ।।१।। ऐक इतिहास पुरातन । आचरितां व्रत हें पावन । सर्वसिद्धिलाभ होत महान । नृपात्मजा या जगतांत ।।२।। एकदा वृत्रासुरानें पीडित । महेंद्र जाहला चिंताक्रान्त । राज्यादिक सोडून वनांत । भयभीत तो राहिला ।।३।। श्रुतिहीन मुनी भ्रष्टाचार । भयोद्विग्न सर्व वर्ण अनिवार । कर्मखंडित होऊन अमर । परम विव्हल झाले होते ।।४।। तयांसी उपोषण घडत । हविर्भाग ना मिळत । सर्व मरणोन्मुख दुःखार्त । गिरिगुहांत राहती ।।५।। तेथ योगिगुरु गृत्समद येत । त्यास साष्टांग ते नमित । इंद्रमुख्य देव समस्त । पूजन करूनी सत्कारिती ।।६।। तदनंतर इंद्र प्रार्थित ।

धन्य माता पिता आमुचें व्रत । धन्य यज्ञ ज्ञानादिक वाटत । तुमच्या अंघ्रिदर्शनानें मनीं ।।७।। तुमच्या दर्शनमात्रें होईल । कल्याण आमुचें निश्चल । साक्षात योगीश्वर प्रबल । सर्वसिद्धिप्रद तुम्ही ।।८।। वृत्रासुर दुष्ट माजला । त्यानें स्वर्गलोक जिंकिला । आमुचा पराभव झाला । राज्य त्यागून वनीं राहतों ।।९।। पशूसम आमुची स्थिती । कर्मनाशें उपास घडती । आता मरण ओढवेल निश्चिती । ऐसें भय वाटतसे ।।१०।। तथापि पुण्ययोगें प्राप्त । जाहले तुमचें दर्शन पुनीत । आतां दया करून आम्हांप्रत । वृत्रनाशाचा उपाय सांगा ।।११।। जग सर्व भ्रष्टाचारी असत । संहार समीप आला वाटत । ऐशा समयीं योगींद्रा दिसत । भविष्य काय तुम्हांसी ।।१२।। गृत्समद तेव्हां सांगत । वाटोनिया दया मनांत । विश्व रक्षणार्थ उद्यत । दुष्टनाशकर वचन ।।१३।। देवेन्द्रा तूं व्रतभ्रष्ट झालास । राज्य मिळतां विसरलास । चतुर्थीच्या उत्तम व्रतास । म्हणोनि कष्ट पावलासी ।।१४।। ज्ञानमदानें त्यजिलास । विघ्नेशाचा मंत्र सुरस । होवोनियां मदलालस । म्हणोनि राज्यहीन झालासी ।।१५।। ऐसें बोलून उपदेशित । चतुर्थीचें माहात्म्य पुनीत । गणेशमंत्र पुन्हां देत । मुनिश्रेष्ठ तो इंद्रासी ।।१६।। तदनंतर तो मुनी परतत । जेव्हां आपुल्या स्थानाप्रत । इंद्र तेव्हां व्रत आचरित । पूजन करी गणेशाचें ।।१७।। त्यानंतर आषाढी संकष्टी येत । इन्द्र ती परमादरें आचरित । गणेशासी मनीं ध्यात । ऐसें संपूर्ण व्रत केलें ।।१८।। दधीचीच्या अस्थींपासून । घडविलें होतें वज्र महान । तें दिव्य आयुध करी धरून । वृत्रासह लढण्या गेला ।।१९।। चतुर्थीव्रताच्या प्रभावें मारित । वज्राघातें वृत्रासुरासी रणांत । महाघोर त्यांचें युद्ध चालत । अन्तीं विजय इन्द्राचा ।।२०।। महावीरा वृत्रासुरासी मारित । तदनंतर शतक्रतु परतत । अन्य देवां समवेत । अमरावतींत आनंदें ।।२१।। तेव्हांपासून देवगण समस्त । शुक्लकृष्ण

चतुर्थीचें व्रत । आपापल्या स्थानीं आचरित । सर्वसिद्धिकर महान ।।२२।। मन्वंतर जेव्हां होत समाप्त । तेव्हां इंद्र स्वानंदलोकीं जात । विघ्नेश्वरासी पाहत । ब्रह्मभूत जाहला ।।२३।। पृथ्वीवरी नर समस्त । चतुर्थीचें व्रत करित । व्रतपुण्यें ते मुक्त होत । गणेशसायुज्य लाभले ।।२४।। ऐसाचि दुसरा वृत्तान्त । या व्रतासंबंधीं असत । पापकंचुकाचा नाश होत । ऐकता तो भक्तीनें ।।२५।। एक ब्राह्मण गुर्जर देशांत । बाल्यापासून पाप करित । परस्त्रीयांसी भोगित । जीवहत्या बहु केली ।।२६।। एकदां आपुली बहीण एकान्तीं । पाहूनी तो दुष्टमती । मदप्रभावें तिच्या संगती । रममाण तो जाहला ।।२७।। अभक्ष्यभक्षण तो करित । वनामाजी संचार करित । द्रव्यलोभीं तो द्विजां मारित । पशुपक्षीही असंख्य ।।२८।। नित्य यवनांसह भोजन । करी तो दुष्ट दुश्चितमन । त्याचीं पापें करण्या वर्णन । अशक्य असे सर्वथा ।।२९।। एकदां हिंडत होता वनांत । परी दिवसभरी त्यास अन्न न मिळत । अति दु:खार्त तो भटकत । पर्वतावरी क्षुधार्त ।।३०।। परी खावया कांहीं न लाभत । म्हणोनि दु:खी होत मनांत । सायंकाळीं गृहीं परतत । तेथही अन्न जल त्यास न मिळे ।।३१।। यवनीस आलिंगोनी घालवित । आपुला समय तो क्षुधार्त । चंद्रोदय होता अवचित । कोणी अन्न आणून दिलें ।।३२।। ते त्यानें भक्षिलें यवनीसमवेत । मायेनें मोहित तो अत्यंत । नंतर होत ज्वरग्रस्त । पापी भोगी फार पीडा ।।३३।। यवनी त्यास स्पर्श ना करित । पंचमी तिथीस तो मरत । गणेशदूत त्यास नेत । स्वानंदलोकीं तत्काळ ।।३४।। तदनंतर तो ब्रह्मभूत । गणेशसायुज्य लाभत । ऐशापरी महापापी उद्धरत । व्रतप्रभावें चतुर्थीच्या ।।३५।। अजाणतां घडता व्रत । जरी एवढें पुण्य लाभत । तरी ज्ञानपूर्वक जे करित । वर्णनातीत लाभ त्यांसी ।।३६।। विधियुक्त व्रत जे नर करिती । त्यांच्या दर्शनानें जन तरती । ऐशापरी

या जगतीं । असंख्य झाले ब्रह्मभूत ।।३७।। त्यांची चरित्रें अनंत । वर्णन करण्या अशक्य असत । आषाढी संकष्टीचें व्रत महिमान असत । अद्भुत पावन या जगीं ।।३८।। जो हें ऐकेल अथवा वाचील । त्यास सर्वार्थाचा लाभ होईल । अन्तीं तो विमुक्त होईल । यांत संशय कांहीं नसें ।।३९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते आषाढ कृष्ण चतुर्थीव्रतवर्णनं नाम पंचविंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पंचविसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आषाढ संकष्टीचें महिमान । ऐकतां उत्सुक माझें मन । श्रावणसंकष्टीचें व्रत महान । तेंही विशद मजला करावें ।।१।। दशरथाची ऐकून विनंती । वसिष्ठ मुनी त्यांस सांगती । चंद्रवंशात जगतीं । होता युधिष्ठिर राजा ।।२।। तो धर्मशील प्रतापवंत । साक्षात धर्मांचा अवतार वाटत । सत्यवचनी करुणायुत । प्रजापालनीं तत्पर ।।३।। द्रौपदी भ्रात्यांसहित । कुंतीमातेच्या संगतींत । महाभाग तो विख्यात । भूमंडळीं अत्यंत ।।४।। वृष्णिकुलोद्भव कृष्ण असत । सहाय्य त्याचा बळवंत । साक्षात नारायण जो श्रीमंत । भूभारहरणीं रत सदा ।।५।। एकदा युधिष्ठिर कृष्णवर्जित । राजसूय यज्ञ करित । धृतराष्ट्र विदुरा पाठवित । तेथ त्यावेळ यज्ञासी ।।६।। कुंतिपुत्र त्याचें स्वागत करित । उत्तम अन्न त्या जेऊं देत । नंतर त्या म्हणे हर्षित । धन्य जन्म कर्मादि माझें ।।७।। तुझ्या अंघ्रियुगाचें दर्शन । झालें आज मजला महान । आपण धर्मवेत्ते ताता शोभन । पालन आमुचें करावें ।।८।। कुशल सांगावें स्वजनांचें । येथ कां आगमन केलें त्याचे । कारण वृत्तान्त सांगून आमुचें । समाधान करावें ।।९।। तेव्हां विदुर म्हणे तयाप्रत । स्वजनांचें

कुशल असें अत्यंत । दुर्बुद्धी धृतराष्ट्राचा निरोप तुजप्रत । सांगतों तो ऐकावा ।।१०।। पुत्राच्या वात्सल्यानें युक्त । दुर्योधनाचा करी पक्षपात । त्या नृपें पाठविलें तुजप्रत । विचक्षणें धृतराष्ट्रें ।।११।। तो मंदधी इच्छा करित । तुज जिंकावे द्यूतांत । महापापी दुर्योधन असत । कुलक्लेशाचा वर्धक ।।१२।। कर्ण त्यासी प्रेरणा देत । शकुनीही उत्साह अर्पित । दु:शासनासमवेत । आतुर तुझें राज्य हरण्या ।।१३।। ऐसें धृतराष्ट्राचें चित्त । लोभी पापी अत्यंत । तो बोलवितो तुजप्रत । युधिष्ठिरा द्यूत खेळावया ।।१४।। त्या पुत्रपक्षपात्याचें वचन । दुर्मतीचें न मानून । कुंती भ्राते स्त्रीसह गमन । कदापि तेथ करूं नको ।।१५।। विदुराचें ऐकून वचन । युधिष्ठिर महायश नि:श्वास सोडून । हितकारक बोलें प्रतिवचन । ऐक ताता विचार माझा ।।१६।। धृतराष्ट्र राजा राज्यावर सुस्थित । भीष्मादी सर्व त्याच्या आज्ञेंत । आम्हीही आहोंत बद्ध तयाप्रत । राजाज्ञा पाळावीं हा धर्म असे ।।१७।। म्हणोनि मीं येतो तुझ्यासहित । जें होणार तें होवो जगांत । ऐसें धर्मयुक्त वचन ऐकून होत । मानस खिन्न विदुराचें ।।१८।। नि:श्वास सोडीं कांहीं न बोलत । पांडव विदुरासमवेत । द्रौपदीसहित सर्व जात । धृतराष्ट्राच्या सभास्थानीं ।।१९।। त्यानें आज्ञा देतां खेळती । कौरव पांडव द्युत युक्ती । दुर्योधन प्रमुख करिती । कलह तेव्हां द्यूतक्रीडेत ।।२०।। शकुनीनें तपें साधिलें होतें द्यूत । म्हणोनि तें त्याच्या अधीन असत । त्याच्या साहाय्यें सुयोधन जिंकित । समग्र राज्य पांडवांचें ।।२१।। तो दुर्मती तदनंतर पाठवित । द्यूतपराजयवशें वनवासांत । समस्त पांडव बंधूंस त्वरित । तत्पूर्वी द्रौपदी पीडिली ।।२२।। सभेंत आणून विटंबित । म्हणे सुंदरी माझी पत्नी होई विनीत । पांच पती का जगांत । असतात कोणा स्त्रीला सांग ।।२३।। ऐसें कोठें न झालें । परी तूं पांच पती केले । आमच्या कुळाचें नष्ट झालें ।

सर्व यश दुष्टे तुझ्यामुळें ।।२४।। दुर्योधनाचा भ्राता फेडित । वस्त्रे तिचीं सभेंत । नागवीं तीस करण्या उद्यत । भीष्मादीस तिरस्कारुनी ।।२५।। दुःशासनाच्या समवेत । पांडव होते द्यूतजित । धर्मरक्षणार्थ तें सहन करित । द्रौपदी स्मरी कृष्णातें ।।२६।। त्यानें गुप्तरूप धरिलें । सभेंत येऊन द्रौपदीस वाचविलें । एक वस्त्र फेडितां दुसरें निर्मिलें । पुनः पुन्हा मायेनें ।।२७।। ऐसीं अनेक वस्त्रें फेडिलीं । परी द्रौपदी नग्न न झाली । परमेश्वरानें राखिलीं । लाज आपुल्या प्रिय भगिनीची ।।२८।। तदनंतर पांडव झाले व्यथित । स्वगृहासी परतत । पांडवांसह जात वनांत । द्रौपदी मुक्तता लाभून ।।२९।। तेथे श्रीकृष्ण त्यांस भेटत । युधिष्ठिरासी म्हणे प्रतापवन्त । होऊनियां क्रोधयुक्त । ऐक प्रतिज्ञा राजशार्दूला ।।३०।। दुर्योधनास ठार मारीन । राज्यकामुका त्या शासन करीन । तुला राज्यावरी स्थापीन । वनवासा तूं जाऊ नको ।।३१।। तें ऐकून श्रीकृष्णवचन । धर्मराज म्हणे हितकर वाक्य नमून । महाबाहो क्रोध त्यजून । धर्म रक्षी जनार्दना ।।३२।। वृष्णिकुलोद्भवा धर्म युक्त । राज्य अर्पावें मजप्रत । तेव्हां कृष्ण सांगे तयाप्रत । गणेश उपासना तूं करी ।।३३।। सर्व भावांसहित पत्नीसहित । पूजी तूं गणेशासी व्रतयुक्त । तो आमुचें कुलदैवत । स्वानंदास कर्ता असे ।।३४।। तो सत्य असत्यांत समान । चतुर्विधरूपें झाला प्रकटन । ऐसें बोलून दशाक्षर मंत्र पावन । कृष्णें दिला युधिष्ठिरासी ।।३५।। विधिपूर्वक हर्षयुक्त । सर्वसिद्धिकर तो गणेशमंत्र पुनीत । तैसेंच व्रताचें माहात्म्य कथित । केशव पुण्यद भ्रांतिनाशी ।।३६।। सर्वादींत करावें हें व्रत । जें चतुर्विधप्रद पूर्ण असत । तें करितां सकल कर्म जगांत । सफल होतें सर्वदा ।।३७।। केशव म्हणे युधिष्ठिराप्रत । हें व्रत नष्ट झालें तव राज्यांत । म्हणोनि राज्यभ्रष्टता तुजप्रत । चतुर्विधपद नष्ट झालें ।।३८।। तें ऐकून युधिष्ठिर । मनीं

विस्मित झाला फार । गणेशास मनीं ध्याऊन सत्वर । विधिपूर्वक व्रत केलें ।।३९।। प्रथम आली श्रावणी संकष्टी । कृष्णपक्षीं चतुर्थी आचरती । पांडव सारे द्रौपदीही प्रीती । नंतर शुक्ल कृष्ण चतुर्थ्या करिती ।।४०।। द्रौपदीसहित वनांत । सर्व सौख्यें पांडवांसी प्राप्त । अन्तीं स्वराज्य मिळवून भोगित । ऐहिक सर्व सुखोपभोग ।।४१।। सुयोधनासी ठार मारिलें । पक्षपाती नृपासही नष्ट केलें । कृष्णचातुर्यें पांडव झाले । सुखी प्रसन्न तदनंतर ।।४२।। युधिष्ठिरें पृथिवीतलावर । विख्यात केलें चतुर्थी व्रत सुंदर । शुक्ल कृष्ण चतुर्थी नर । समस्त आचरती राज्यीं त्यांच्या ।।४३।। इहलोकांतील भोग पांडव भोगिती । अंतीं नातवास राज्य देती । पांडव सारे ज्ञानयुक्त चित्तीं । स्वअंशांत विलीन झालें ।।४४।। त्यांचे अन्य प्रजाजन । क्रमें जाहले गणेश्वर पदयुक्त महान । गणेश्वरासी पाहून । ब्रह्मभूत सारे झाले ।।४५।। ऐसें व्रतमाहात्म्य तुजप्रत । नृपोत्तमा सांगितलें पुनीत । दुसरा एक असे वृत्तान्त । महापुण्यप्रद परम ।।४६।। कर्नाटकांत एक कारुक । होता महापापी नि:शंक । वनांत तो शस्त्रधारक । ठार मारी वाटसरूंस ।।४७।। परस्त्री एकाकिनी पाहत । तरी बलात्कार तिजवरि करित । ऐसा तो महा खळ अत्यंत । गोवध ब्राह्मणहत्या करी ।।४८।। द्रव्यलाभार्थ मारित । मांसभक्षणार्थ पापें करित । अनेक पापें आचरित । नित्य जाऊन वनांत ।।४९।। गावांतील जनांस मारित । त्यांचें द्रव्य हरी समस्त । महाचोर दुर्मती तो असत । एकदा गेला होता वनीं ।।५०।। लोकांस मारण्या उद्यत । बैसला होता गुहेंत । तेव्हां वृष्टी अकस्मात । मुसळधार तेथ झाली ।।५१।। जेथ तेथ पाणी तुंबत । नद्याविहिरी पाण्यानें भरत । वृष्टिभयें गुहेंत । अडकला तो महाचोर ।।५२।। दैवयोगें ती चतुर्थी होती । कांहीं न मिळे खावया तयाप्रती । श्रावण कृष्णपक्षीं निश्चिती ।

उपवास घडला तयासी ।।५३।। अन्नहीन त्यास व्रत घडत । संपूर्ण दिनभरी अकस्मात । चंद्रोदय होतां येत वाहत । शहाळें एक गुहेजवळी ।।५४।। त्यांतील खोबरें तो खात । नारिकेलाचें जल पीत । रात्र संपता बाहेर पडत । गुहेंतून तो महापापी ।।५५।। तेथ एक वाघ भयंकर । अवचित आला उग्र । त्याने भक्षिलें त्यास सत्वर । पंचमीस मृत्यू त्याचा झाला ।।५६।। त्या पुण्यानें तो पापी जात । स्वानंदकपुरीं होऊन पुनीत । व्रतप्रभावें होत । ब्रह्ममय तदनंतर ।।५७।। नकळत घडलें व्रत । त्याचा एवढा प्रताप दिसत । तरी ज्ञानपूर्वक जे करित । त्यांसी लाभ अवर्णनीय ।।५८।। नाना जन व्रत करून । ऐहिक भोग लाभून । अन्तीं स्वानंदलोकीं जाऊन । मुक्त जाहले असे ख्यात ।।५९।। ऐसें श्रावण कृष्ण चतुर्थीचें महिमान । ऐकती वा वाचती पावन । त्या नरांसीं भुक्तिमुक्ति लाभून । अन्तीं गणेशसायुज्य लाभे ।।६०।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते श्रावण कृष्ण चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम षडविंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सव्वीसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ विनवी वसिष्ठाप्रत । भाद्रपद संकष्टीचें महिमान अद्भुत । आता सांगावें मजप्रत । सर्वसिद्धिप्रदायक जें ।।१।। वसिष्ठ तेव्हां निवेदिती । द्राविडांत राजशार्दूल परमद्युती । वीरसेन नामा राज्यनीती । पारंगत सार्वभौम ।।२।। अन्य राजे करभार देत । सुराज्य त्याचें प्रख्यात । धर्मशील सदा आनंदयुक्त । भक्तिभावें प्रजा पाळी ।।३।। आपुल्या राज्यांत क्षुधार्त । कोणासही तो न ठेवित । पुत्रासम प्रजेस मानित । औरसपुत्र परी त्यास नव्हता ।।४।। पुत्रप्राप्तीस्तव

जपहोम । तीर्थक्षेत्रादी केलीं अनुपम । परी पुत्रसुख मनोरम । त्यासी न मिळालें दुर्दैवें ।।५।। तेव्हां तो राजा अतिदु:खित । राज्य त्यागून गेला वनांत । स्त्रीसहित तेथ हिंडत । महावनीं क्षुधार्त फिरे ।।६।। सुमंतु नामा ब्राह्मण येत । समिधा जमवण्या त्या स्थळांप्रत । राजास पाहून दयायुक्त । निरीक्षिली अवस्था त्याची ।।७।। वेदवेदांगवेत्ता साक्षात । सर्व शास्त्रांचा प्रवर्तक प्रख्यात । पुराणज्ञ महायोगी प्रतापवंत । व्यासशिष्य तो सुमंतु ।।८।। त्यास पाहून तत्काळ उठत । प्रणाम करी वीरसेन विनीत । हात जोडून प्रार्थित । भक्तिभावें तयासी ।।९।। धन्य माझे मातापिता । धन्य कर्म कुळ यश आता । विद्या व्रतादींची सांगता। तुमच्या अंघ्रिदर्शनें जाहली ।।१०।। राज्य सोडून मी वनांत । पुत्रलाभ होण्या चिंतित । पापी असुनी आज होत । दर्शन तुमचें पूर्वपुण्यें ।।११।। नाना यत्न मीं केले । पुत्रप्राप्तीस्तव ते विफल झाले । आतां तुझी कृपा हाच या वेळे । उपाय सुखद वाटतसे ।।१२।। ऐसें ऐकून त्याचें वचन । वसिष्ठ सांगे कथाभाग प्रसन्न । सुमंतु मुनि संतोषून । म्हणे तूं चिंता करूं नको ।।१३।। राजेंद्रा ऐक वचन हित । कुलतारक पुत्र तुज होईल निश्चित । यांत संदेह लव नसत । पाप तुझें ऐक आता ।।१४।। चतुर्थीचें थोर व्रत । लोप पावलें तव राज्यांत । त्यामुळें पुत्रहीनता प्राप्त । नृपाधमा तुजलागीं ।।१५।। जें सर्व कार्यांत प्रथम । सर्व व्रतांत आदी परम । चतु:पदार्थप्रद मनोरम । तें न करतां निष्फळ सारें ।।१६।। तूं नाना पुण्यद सर्वसंमत । कर्म केलेंस जगीं अत्यंत । परी चतुर्थीव्रत त्यक्त । म्हणोनि पुरुषार्थ मुकलासी ।।१७।। ऐसें बोलून महिमान । चतुर्थीव्रताचें सांगून । गणेशाचें उच्चतम ज्ञान । सर्वही त्यासी निरूपिलें ।।१८।। वीरसेनाच्या चित्तांत । गणेशज्ञानार्थ इच्छा असत । ती पुरवी सांगून किंचित । गणेशरूप महिमान ।।१९।। गणेशाचें स्वरूप वर्णन ।

अशक्य असे सर्वथा महान । उपाधिसंयुत परी प्रसन्न । राजेंद्रा तुज सांगतों ।।२०।। सुमंतु म्हणे वीरसेनाप्रत । माझाच ऐक पूर्व वृत्तान्त । मी तप:प्रभावें होत । समर्थ पूर्वी भूमंडळीं ।।२१।। अतितपें अंतर्ज्ञान उत्पन्न । तेणें विस्मित झालें मन । जडादिक भूमिका साधून । नाना ब्रह्मभेदातीत ।।२२।। ऐशा क्रमें स्वानंदलोकांत । मी तपप्रभावें जात । शांतिसुखीं सक्त ब्रह्मभूत । परी भेदमय द्वंद उरलें ।।२३।। तें पाहून जात व्यासांप्रत । शांत जो महामुनी जाणे हित । त्यास प्रणाम करून प्रार्थित । शांतिरूप मज सांगा ।।२४।। मी तुमचा शिष्य विनीत । तारावें आता भवार्णवांत । ऐशी प्रार्थना ऐकून हर्षित । व्यास म्हणे तयासी ।।२५।। ऐक पुत्रा गणेशज्ञान । योगसेवेनें जें लाभतें महान । शांतीचें शांतिरूप पावन । ब्रह्मभूत सरूप ।।२६।। स्वत:पासून ज्याचें उत्थान । अन्य उद्भवें दुसऱ्यापासून । त्यांच्या अभेदे होत साधन । असत स्वानंद-रूपाचें ।।२७।। तेथ जें अमृतमय असत । सद्रूप स्वस्वरूप उदात्त । त्यांच्या अभेदभावें विलसत । आनंद तो स्वानंद म्हणती ।।२८।। तिघांनी हीन तिघांनी युक्त । ऐसें असे तें ब्रह्म अव्यक्त । चौघांच्या संयोगें ख्यात । स्वानंदब्रह्म जगांत ।।२९।। पंचगतीहीन जें असत । तेथ सर्वांचा अयोग घडत । संयोग अयोग एकत्र होत । शांतिप्रद तो गणराज ।।३०।। गण समूहरूप असत । आंतरबाह्यादि योगें ख्यात । अन्नादि ब्रह्मरूप ते असत । जाणावें योगसेवेनें ।।३१।। त्यांचा स्वामी गणेशान असत । त्यासी भजतां होशील निश्चित । ब्रह्मभूत तूं मुक्त । यांत संशय कांही नसे ।।३२।। चित्त जें पंचविध तें बुद्धिवाचक । मोहस्वरूप चित्त सिद्धिरूप पावक । त्यांचा स्वामी गणाधीश एक । मायेसह खेळ करी ।।३३।। पंचचित्तांच्या निरोधें लाभत । चित्तधारक जो उदात्त । चिंतामणि म्हणोनि ख्यात । वेदांत पुत्रका सर्वत्र ।।३४।। चित्ताचा त्याग करून । संमोह

सारा सोडून । होई तू चिंतामणी महान । गणेश योगसेवेने ।।३५।। ऐसे सांगून मज देत । एकाक्षर मंत्र प्रभू तो पुनीत । विधिपूर्वक मजप्रत। स्वीकारिला तैं विनीतभावें ।।३६।। नंतर त्यासी प्रणाम करून । माझ्या आश्रमांत परतून । जप केला मीं श्रद्धा ठेवून । गणपतीचें ध्यान करित ।।३७।। त्यानंतर अल्पावधींत । शांतिलाभ मज होत । तरीही गणराजाचें पूजन करित । अविरत मी भक्तीनें ।।३८।। तेव्हां तो विघ्नराज प्रकटत। एके दिनी माझ्या पुढ्यांत । गणेशास प्रत्यक्ष पाहून विस्मित । मानस माझें जाहलें ।।३९।। हर्षभरें पूजिलें त्यांस । करूनि अथर्वशीर्षें स्तुतीस। आपुली भक्ति विशेष । देऊन मज तो अदृश्य झाला ।।४०।। तेव्हांपासून गाणपत्य मी भजत । नित्य आदरें गणेशाप्रत । तूंही पावशील जगांत। शुभ सर्वही त्यांस भजतां ।।४१।। ऐसे सांगून त्यास देत । षोडशाक्षर मंत्र पुनीत । विधिपूर्वक प्रख्यात । नंतर अंतर्धान पावला ।।४२।। पत्नीसहित त्यासी नमून । स्वनगरीं त्वरित परतून । गणनायकाचें भजन। राजा करी भक्तिभावें ।।४३।। तदनंतर प्रथम जी येत । भाद्रपद संकष्टी प्रख्यात । प्रजाजनांसह आचरित । व्रतपूर्वक वीरसेन ।।४४।। व्रतपुण्याच्या प्रभावें होत । राजासी पुत्रप्राप्ती इच्छित । रोगरहित प्रजा समस्त । जाहली तेव्हांपासून ।।४५।। वीरसेनाच्या राज्यांत । समस्त प्रजाजन आचरित । शुक्ल कृष्ण चतुर्थीचें व्रत । श्रद्धापूर्वक सर्वदा ।।४६।। वृद्धापकाळीं वीरसेन अर्पित । आपुलें राज्य स्वपुत्राप्रत । पत्नीसहित वनांत जात । गणेशासि सतत भजे ।।४७।। अन्तीं गणेशलोकी जात । ब्रह्ममय तो नृप होत । तैसेचि लोक समस्त। उद्धरून गेले व्रतप्रभावें ।।४८।। आणखी एक वृत्तान्त । दशरथा सांगतो तुजप्रत । भाद्रपद संकष्टीचें माहात्म्य अद्भुत । जेणें सुस्पष्ट होईल ।।४९।। आंध्र प्रांतात एक धीवर । पापकर्मी रत फार । सर्व हिंसक भयंकर।

कलह करी सर्वदा ।।५०।। लोकांचें द्रव्य चोरित । पांथस्थांसी तो लुटित । परस्त्रीचा मोह करित । नाना पापपरायण ।।५१।। त्याचीं पापें होतीं अगणित । एकदां तो जात वनांत । त्या दिवशीं खावया न मिळत । काहीही त्या पाप्यासी ।।५२।। जन समुदाय महान । वनांत आलेला पाहून । त्यांच्या भयें गुहेत लपून । बैसला तो धीवर ।।५३।। ऐसा संपूर्ण दिवस गेला । कांहीं न मिळतां खावयाला । उपवास दिवसभरी घडला । त्या कोळ्यासी त्या दिवशीं ।।५४।। जेव्हां जनसमुदाय परतला। तेव्हां तो कोळी विश्वासला । गुहेंतून बाहेर पडला। नंतर गेला स्वगृहास ।।५५।। चंद्रोदय होतां सुतांसहित । भोजन करी तो धीवर क्षुधित । भाद्रपद संकष्टी ती असत । योगायोगें त्या दिवशीं ।।५६।। पंचमी तिथीस अकस्मात । सर्पदंशें तो मरत । गणराजाचे दूत येत । स्वानंदलोकीं त्यास नेण्या ।।५७।। त्या धीवरास घेऊन । स्वानंदलोकीं गेले परतून । गणेशास तेथ पाहून । ब्रह्मभूत तो जाहला ।।५८।। अजाणता घडलें व्रत । विधिहीन परी सफल होत । तरी जाणीवपूर्वक करीत । त्यांसी फळ केवढें मिळें ।।५९।। चतुर्थीव्रताच्या प्रभावें मुक्त । जन जाहले असंख्यात । त्यांची गणना अशक्य असत । सर्वथैव या जगीं ।।६०।। ऐसें हे भाद्रपद संकष्टीचें व्रत । त्याचें माहात्म्य अति अद्भुत । वाचका पाठकांसी लाभत । मनोवांच्छित सर्वही ।।६१।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते भाद्रपद कृष्ण चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम सप्तविंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सत्तावीसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । भाद्रपदी संकष्टीचें महिमान । सांगितलेंत तुम्हीं

प्रसन्न । आतां अश्विनीचा वृत्तान्त कथून । उपकृत मजसी करावें ।।१।। ऐसें दशरथें प्रार्थिलें । तें वसिष्ठे मानिलें । वृत्त तें सारे सांगितलें । सर्वसिद्धिप्रदायक ।।२।। पार्वती शंकर तप करिती । दिव्य सहस्र वर्षे चतुर्थी व्रत आचरिती । गणेशासी तैं प्रार्थिती । पुत्र जाहला तो तयांचा ।।३।। त्यांच्या वीर्यापासून । जन्मला होता कार्तिकेय प्रसन्न । गणेशावरती तेवढा स्नेह न वाटून । पक्षपात जाहला ।।४।। कार्तिकेय गणेशासी स्पर्धा करित । नित्य त्यासवें भांडत । माझ्यानंतर तुझा विवाह निश्चित । होईल ऐसें गणेशा म्हणे ।।५।। ऐशी त्यांची स्पर्धा चालत । शिवपार्वती तैं विचार करित । विवाह पुत्रांचा करण्या उद्यत । मानसीं चिन्ता तयांच्या ।।६।। हा विघ्नेश्वर साक्षात । ब्रह्मरूप आहे संशयातीत । झाला जरी क्षोभित । पदभ्रष्ट करील विशेषें ।।७।। म्हणोनि जरी औरस पुत्राप्रत । सांगावें आपुलें हृद्गत । तूं ज्येष्ठ असलासी तरी संकल्पित । तुजपूर्वी विवाह गणेशाचा ।।८।। तरी तो सेनानी रागावेल । त्याचाच विवाह आधी शोभेल । म्हणोनि कपट करूनी निभावेल । प्रश्न हा अति कष्टप्रद ।।९।। ऐसा विचार शिव पार्वती करिती । उभय पुत्रांस बोलाविती । पृथ्वीप्रदक्षिणा करोनि आम्हांप्रती । प्रथम पुत्र जो परतेल ।।१०।। त्याचा विवाह प्रथम करीन । ऐसें ऐकतां शिववचन । गणनाथ म्हणे रागावून । ज्येष्ठ मजला कां त्यागितां ।।११।। स्थूल देह माझा असत । उंदीर वाहन वर्तत । पृथ्वीप्रदक्षिणा करणें नसत । शक्य मजला सदाशिवा ।।१२।। ऐसें बोलून गणाधीश राहत । आपुल्या सदनीं निवांत । स्कंद झाला हर्षभरित । मोरावरी आरूढला ।।१३।। वेगानें पृथ्वी प्रदक्षिणा करित । इकडे गणेश माया दाखवित । पार्वती शंकरांसी पूजित । प्रदक्षिणा घातली तयांसी ।।१४।। तदनंतर म्हणे शंकरा । आता माझा विवाह करा । मातापित्यांची प्रदक्षिणा अवधारा । पृथ्वी प्रदक्षिणेसम

।।१५।। ऐसें शास्त्र सांगत । ऐकून हा गणेशाचा तर्क कंपित । शंकर म्हणें बाळा त्वरित । करीन मी तुझा विवाह ।।१६।। परी तूं क्रोध नको करूं । विवाह मंगल तुझें करूं । तेव्हां एकान्तीं भेटता हरू । पार्वती विचारी मायेनें ।।१७।। कार्तिकेयास सोडून । ढुंढीचा कां केलांत मान । तेव्हां तिजप्रती शंकर वचन । म्हणे ऐक शैलतनये ।।१८।। हा गणेश जरी रागावेल । तरी सर्वस्व आपुलें हरील । म्हणोनि स्नेह सोडून आतां अचल । राख धर्म सनातन ।।१९।। हा पुत्र नसे ब्रह्म साक्षात । आपुल्या घरीं जन्मला असत । ऐसें बोलून सतीप्रत । शंभूनें योजिला गणेशविवाह ।।२०।। हृदयीं दु:ख न ठेवित । गणेशाचें लग्न लावित । विवाह पूर्ण होतां येत । कार्तिकेय परतोनी ।।२१।। तेव्हां विघ्नकर विघ्न करित । तेथें एक परम अद्भुत । नारद कार्तिकेयासी सांगत । अचानक प्रकट होऊन ।।२२।। गणेशाचें विवाह कृत्य केलें । मातापित्यांनीं पूर्वींच भलें । तुज सेनानीस फसविलें । निंद्य कर्म हें केवढें ।।२३।। म्हणोनी तूं न पहावें । मातापित्यांचें मुख वर्जावें । ऐसें सांगून कलह स्वभावें । नारदें कळ लाविली ।।२४।। स्कंद नि:श्वास सोडून । गेला श्रीशैलावरी क्रुद्धमन । पुत्राचा वृत्तान्त ऐकून । पार्वती शंकर शोध करिती ।।२५।। शोध करीत शैल-पर्वतीं जात । तेव्हां कार्तिकेय पळून जात । क्रौंचरन्ध्रीं जाऊन लपत । तें जाणतां विलाप करिती ।।२६।। शोकसंविग्न त्यांचें चित्त । तेव्हां मुद्गल विप्रेंद्र तेथ येत । त्यास पाहून सत्कार करित । पूजिती त्यांस यथाविधि ।।२७।। तो सुखासनीं बैसत । तेव्हां सांगती वृत्तान्त । स्कंदाची भेट आम्हांप्रत । होईल कोणत्या उपायें ।।२८।। पार्वती शोकाकुल रडत । तेव्हां मुद्गल बोले हित । महाभागा शंभू तूं असत । साक्षात् प्रभू सर्वज्ञ ।।२९।। विद्यारूपा ही आद्या । सर्वार्थदायिनी शक्ति सर्वज्ञा । तथापि युक्ति

एक सुसाध्या । सांगतों मी तुम्हांसी ।।३०।। तुम्हांस द्विविध पुत्र प्राप्त । जैसें कथिलें शास्त्रांत । तुजसम जगीं नसत । अन्य कोणी दैववान ।।३१।। योगाभ्यासें जन्म विघ्नेश घेत । पुत्र तुमच्या घरांत । ब्रह्मनायक चिंतामणि वर्तत । समाधिज पुत्र तुमचा ।।३२।। देह शक्तिमय असत । तेथ आत्मा पुरुष ख्यात । त्यांच्यापासून जन्मत । योगबलें ब्रह्मपुत्रक ।।३३।। अर्धनारीश्वर तूं असत । शंभो तुजपासून गजानन जन्मत । तो ब्रह्मभूतपदाचा पालक जगांत । यांत संशय कांहीं नसें ।।३४।। भिन्न ही शक्ति असत । भिन्न देहधारी तूं साक्षात । भिन्नभावें जन्मत । तुझा पुत्र स्कंद हा ।।३५।। स्कंद सर्वत्र संमत देह सौख्यकर । गणेश हा शांतिसौख्यकर । पुत्रभावें दोघेही मोदकर । मोहित तूं झालास ।।३६।। स्नेहानें शंभो तू मानित । अधिक प्रेमानें स्कंदाप्रत । ऐसी श्रद्धा तूं न ठेवित । ब्रह्मरूप गणेशावरी ।।३७।। त्या विघ्नेश्वरावरी नसत। श्रद्धा तुझी म्हणून सांप्रत । तूं झालास विघ्नयुक्त । आतां एकचि उपाय ।।३८।। त्या विघ्नेश्वरासी भजावें । स्नेहभावें विषय निंदावे । तरीच जाण दूर व्हावे । विषय ताप सत्वर तुझे ।।३९।। ते स्वयंवश होतील । दु:ख सारें टळेल । विघ्नेश्वरापूर्वी विवाह मंगल । स्कंदाचें कां योजिलें होतें ।।४०।। शक्तिसहित तूं मनांत । ऐसें पूर्वी आणिलें गुप्त । म्हणोनि सर्व निष्फळ होत । वियोग झाला स्कंदाचा ।।४१।। त्या विघ्नेश्वरासी शरण । जावें आता तूं अशरण । ऐसें बोलून मर्म दारुण। मुद्गलमुनी निघून गेले ।।४२।। त्यांचें वचन सत्य मानून । स्कंदाचा स्नेह सोडून । विघ्नेशाचें करिती पूजन । भजनही त्याचें शिवशक्ति ।।४३।। तेथ प्रथम अश्विनी संकष्टी येत । ती दोघेंही व्रत करित । माया जी भ्रांतिकरी मोहवित । ती त्यागून शांत झाले ।।४४।। कोणाचा पुत्र कोण माता । कोण पिता सांगा तत्त्वतां । भ्रमदायक ही सर्व वार्ता ।

विघ्नेश्वरें कौतुक दाखविलें ।।४५।। त्यासीच शरण ती जात । तेव्हां तो चमत्कार दाखवित । स्कंदाचा बुद्धिभेद करित । दशरथा तें वृत्त ऐसें ।।४६।। स्कंद विचारी स्वहृदयांत । मीं अति मूढ असत । शंकर पार्वतीस त्यागून राहत । स्पर्धा करितों गणेशासह ।।४७।। ज्येष्ठ तो नित्य गणपति । महाप्रभू साक्षात जगतीं । शिवशक्ति तपे आराधिती । तें ब्रह्म पुत्र झालें ।।४८।। वरदानापरी जन्मत । स्वानंदवासकारी हा असत । सिद्धिबुद्धींचा पति विलसत । योगशांतिस्वरूप तो ।।४९।। त्याचें रहस्य मीं न जाणलें । केवढें हें मूढत्व घडलें । विचार करून गमन केलें । कैलासाप्रति तत्काल ।।५०।। कैलासावर परतून । आधीं विघ्नेशा प्रणाम करून । भक्तिभावें त्यास पूजून । अथर्वशीर्षे स्तवन केलें ।।५१।। तदनंतर उमा सदाशिवांचें पूजन । करून घाली साष्टांग नमन । तेही करिती सन्मान । स्कंदाचा अति प्रेमभरें ।।५२।। त्यास वरती उठविती । तेव्हां कार्तिकेय म्हणे शिवाप्रती । तुमची आज्ञा मजप्रती । सर्वथा असे शिरोधार्य ।।५३।। शांतियोगयुक्त होत । म्हणोनि जरी शिवप्रेरित । तरी विवाहास नकार देत । म्हणे नको मज बंधन ।।५४।। स्त्री बंधकरी न इच्छित । आता मीं गणपांत रत । अत्याग्रहानें युक्त । स्कंद भजे गणनायकासी ।।५५।। माया सुख त्यागून । गणेशनिष्ठ तो महान । हें सारें संकष्टीचें महिमान । सर्व संमेलनकर शांतिदायक ।।५६।। दुसरे ही एक चरित्र तुजप्रत । दशरथा सांगतों पुनीत । एक द्विज होता वंग देशांत । पापकर्मा अत्यंत जो ।।५७।। ब्राह्मणाचा मार्ग सोडून । नित्य करी मद्यपान । एक यवनी आणून । यवन आपण जाहला ।।५८।। त्याचे दोष अगणित । वर्णन करण्या शक्य नसत । परदोष उच्चारितां दोषयुक्त । मानव होतो सर्वदा ।।५९।। एकदा तो पापी ज्वरयुक्त । अश्विनसंकष्टी दिनीं होत । त्या दिवसभरी

अन्नजल वर्जित । परी चंद्रोदयीं जेवला ।।६०।। सुपक्व तांदुळाची पेज पिऊन । उपवास सोडिला ज्वरें म्लान । तदनंतर कांहीं काल जगून। मरण पावला तो द्विज ।।६१।। त्यास नेऊन ब्रह्मभूत । गणेशाचे दूत करित । ऐसा तो महापापी तरत । मुक्ति पावला व्रतप्रभावें ।।६२।। ऐसे नाना जन भोगून । ऐहिक भोग जे वांच्छी मन । अन्तीं मुक्त होऊन। ब्रह्मरूप जाहले ।।६३।। हें अश्विन संकष्टीचें महिमान । ऐकेल किंवा वाचील सुमन । तो सर्वार्थ लाभून । अंतीं गणेशसायुज्य मिळवी ।।६४।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते आश्विन कृष्ण चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम अष्टाविंशोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय अठ्ठाविसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । दशरथ म्हणे वसिष्ठांप्रत । कार्तिक कृष्णपक्षांत । जी संकष्टी चतुर्थी येत । तिचे माहात्म्य मज सांगावें ।।१।। तेव्हां इतिहास पुरातन । वसिष्ठ दशरथासी करिती कथन । महाराष्ट्रांत कर्दम नाम बलवान । महातेजस्वी एक नृप ।।२।। तो वेदवेदार्थ जाणत । स्वधर्मीं होता रत । लोकांचें संगोपन करित । पुत्रापरी आपुल्या ।।३।। षष्ठांश घेऊन करभार । चतुरंग सेना राखिली अपार । वैभवें जैसा दुसरा कुबेर । शस्त्रास्त्रांत परायण ।।४।। स्वबळें अन्य नृपांस । वश केलें विशेष । पृथ्वी सर्वही वश तयास । करभार देती अन्य नृप ।।५।। सामंत सारे आज्ञांकित । पुण्यवंत तो धर्मरत । नाना दानपरायण असत । देव विप्र अतिथि प्रिय ।।६।। आपुल्या पत्नीसंगें रत । अनेक तीर्थाटनें करित । परवीरांचें क्रन्दन करित । नाना गुणयुक्त तो ।।७।। परी त्यास क्षयरोग झाला । दारुण पीडा होत तयाला । अस्थिपंजर मात्र

राहिला । शोकग्रस्त अत्यंत ।।८।। नाना उपाय करित । परी रोगमुक्त न होत । तीर्थयात्रा बहुविध करित । तथापि पीडा न शमली ।।९।। अनेक देवतांचें अर्चन । केलें त्यानें एकनिष्ठ मन । तरी रोग अनिवार्य वाढून । दु:खित झाला मानसीं ।।१०।। विप्रांकरवी देवतांचें पूजन। त्यानें केलें जरी श्रद्धा ठेवून । तरी रोग अधिकचि वाढून । राजा संत्रस्त जाहला ।।११।। नंतर राज्याचा त्याग करून । प्रधानांवरी राज्य सोपवून। सस्त्रीक वनीं जाऊन । इकडे तिकडे भटकत होता ।।१२।। सैरावैरा वनांत फिरत । शांतिधर तो वैराग्ययुक्त । तेव्हां मंकणक विप्रा पाहत । योगिसत्तमा श्रेष्ठांस ।।१३।। त्यास साष्टांग नमन करित । करुणस्वरें तो रडत । मुनिमुख्य तो दया येऊन तयाप्रत । म्हणे राजा ऐक वचन ।।१४।। जाणलें मीं महाभागा वृत्त । तूं कां झालास रोगपीडित । ज्या पापास्तव हें तूं भोगित । त्याचें स्वरूप सांगतों ।।१५।। तुझ्या राज्यांत चतुर्थीचें व्रत । मुख्य तें झालें लुप्त । त्यायोगें पापसंयुक्त। होऊन तूं जाशील नरकांत ।।१६।। राजा सर्व कार्यांत प्रथम । करावें तें व्रत उत्तम । सर्वसिद्धि फलप्रद मनोरम । तें न करता सारें निष्फल ।।१७।। म्हणोनी तू नानाधर्म परायण । झालास चतु:पदार्थ विहीन । व्रत ना केलेंस हें कारण । नृपाधमा ऐक महिमा ।।१८।। तेव्हां कर्दमराजा म्हणत । धन्य माझा जन्म वाटत । तुमच्या पदकमलाचें दर्शन घडत । व्रतमाहात्म्य ऐकिलें ।।१९।। तरी आतां गणेशस्वरूप सांगावें। दयानिधे मज बरवें । त्या सर्वदेवाधिदेवा भक्तिभावें । भजेन मी निरंतर ।।२०।। मंकणक म्हणे तयाप्रती । गणेशवर्णन अशक्य जगतीं । परी उपाधि संयुक्त परमप्रीती । सांगतो कांहीं कर्दमा ।।२१।। पूर्वी मीं पानें खाऊन । तप केलें महान । ऐसा बहुत काल जातां एकदिन । हातांत काटा मोडला ।।२२।। तेव्हां त्या जखमेतून । पत्ररस वाहे पावन ।

तें अद्भुत पाहून । नाचलों मी आनंदानें ।।२३।। अहो माझ्या देहांत । रक्ताचा रस होत । पत्रभक्षणें हें घडत । तपश्चर्याप्रभावें माझ्या ।।२४।। नंतर माझ्या नृत्यानें कंपित । चराचर भयभीत । देव सारे झणीं जात। शंकरासी भेटावया ।।२५।। शंकर सर्व देवांसमवेत । तेथ आला जेथ मी नाचत । म्हणे प्रेमें मजप्रत । महाभागा कौतुक कोणतें? ।।२६।। ऐसें बोलून थांबवित। रसप्रवाह भस्मरूपांत परिवर्तित । करून अन्तर्धान होण्या इच्छित । शंकर तो महायोगी ।।२७।। तें पाहून विस्मित । रसाचें भस्मस्वरूप क्षणांत। नाच थांबवून प्रणाम करित । भक्तिभावें मीं स्तविलें ।।२८।। तदनंतर शंकर अंतर्धान । पावतां मी राजेंद्रा थक्क मन । निश्चय केला एक महान । शंकराहून श्रेष्ठ न अन्य ।।२९।। त्याच्यासम कर्म करण्यास । शक्य नसे कवणास । माझ्या तपाच्या रसास । भस्मरूप केलें ब्रह्माकारें ।।३०।। हें जाणून विष्णुभजन सोडून। महेशाच्या भजनीं मनं । लाविलें मीं तप सोडून । योगयुक्त क्रमें झालों ।।३१।। शमांत होऊन रत । जडादी योगभूमींचा त्याग करित । सहज स्वभावीं मोहवर्जित । तेव्हां प्रतिष्ठित मी झालों ।।३२।। पृथ्वीवरी इतस्ततः फिरत । सहज ब्रह्म मी पाहत । मोहहीन जें अद्भुत । योगधारक मी शिवभक्त ।।३३।। परी सहज ब्रह्म स्वाधीन । शांतिद ब्रह्मीं न योग्य वाटून । ब्रह्मांत भ्रांत होऊन । सूर्यास शरण मी गेलों ।।३४।। प्रणाम करून सौरमार्गें स्तवित। प्रसन्न तो मज वर देत । तेव्हां मी सूर्यास प्रार्थित । शांतिप्रद ब्रह्म सांगावें ।।३५।। सहज जें मोहहीन । जरी ब्रह्म स्वाधीन । नसे शांतिदायक म्हणून । उपदेश मजसी करावा ।।३६।। तदनंतर भक्तिप्रसन्न । सूर्य सांगे मज वचन । गणेशासी भज तूं श्रद्धा ठेवून । तरीच शांति मिळेल तुला ।।३७।। शक्ति असत् ख्यात । सूर्य सत् वर्तत । विष्णुदेव सम जगांत । शंकर सहज स्थित जाणावा ।।३८।।

त्यांच्या योगें गणेश्वर । चारांच्या संयोगें स्वानंदकर । अयोगें पाचांच्या हीन खरोखर । मायारहित तो असे ।।३९।। संयोगांत मायायुक्त । अयोगांत माया विवर्जित । त्यांच्या संयोग अयोगें असत । शांतिप्रद तो ब्रह्मनायक ।।४०।। चित्त आहे मोहयुक्त । त्याचा त्याग करून योगांत । शांतिप्रद या मार्गांत । चिंतामणीस तूं भजावें ।।४१।। ऐसें करितां योगिवंद्य होशील । सांगून ऐसें वचन अमल । षडक्षर मंत्र मज दिला विमल । विधिपूर्वक तयानें ।।४२।। त्याचा स्वीकार करून । विनम्रभावें त्यास वंदून । आपुल्या आश्रमांत परतून । मंत्रपरायण मी झालों ।।४३।। ऐसें करिता अनुष्ठान । माझ्यासमोर प्रकटून । मज दिलें प्रत्यक्ष दर्शन । गणेशदेवानें प्रेमभरें ।।४४।। त्याचें विधिपूर्वक पूजन । केलें मीं वंदनपूर्वक मनन । नानाविध स्तुति करून । तोषविलें मीं गणेशासी ।।४५।। दृढ भक्ति चित्तांत । तेव्हां तो माझ्या स्थापित । अन्तर्धान नंतर होत । तेव्हांपासून मी गाणपत्य ।।४६।। भजतों आदरें गणेशाप्रत । स्वच्छंदें मी जगांत । ऐसें सांगून कर्दमाप्रत । षडक्षर मंत्र दे विधिपूर्वक ।।४७।। मंकणक मुनि अन्तर्धान । पावतां राजा हर्षयुक्त मन । आपुल्या घरासी परतून । मंत्र जपूं लागला ।।४८।। तदनंतर कार्तिक मास येत । शुक्लकृष्ण चतुर्थीचें व्रत । करी नृप तो विधियुक्त । तेणें रोगमुक्त जाहला ।।४९।। प्रजाजनांकरवी करवी । म्हणे व्रताची महती जाणावी । ह्या व्रताची थोरवी । अपूर्व असे असामान्य ।।५०।। जगीं व्रत केलें प्रख्यात । तो राजर्षी रोगमुक्त । गणनायकासी भजत । वंध्यत्वहीन प्रजाजन झाले ।।५१।। सारे प्रजाजन गणेशासी भजत । राजा वृद्धत्व पुढे पावत । सस्त्रीक तेव्हां जात वनांत । पुत्रास राज्य देऊन ।।५२।। तेथ राहून वनांत । विघ्नेश्वरासी भजे अविरत । अन्तीं स्वानंद लोकांत । ब्रह्मभूत तो जाहला ।।५३।। प्रजाजनही क्रमें होत । ब्रह्मभूत जे

भूमिलोकांत । ऐसें हें व्रतमाहात्म्य अद्भुत । कथिलें तुज नृपोत्तमा ।।५४।। ऐसेंच एक अन्य वृत्त । चांडाळ कोणी पापरत । हिंसा करी अविरत । ब्राह्मणांसी मारी अन्यांसहित ।।५५।। परस्त्रीस वनीं पाहत। तरी बलात्कारे तिज भोगित । ऐसीं पापें नानाविध करित । दुर्मती तो सर्वदा ।।५६।। परी एकदा कार्तिक मासांत । कृष्ण चतुर्थीचा दिन असत। त्या दिनीं तो पापी अविनीत । भटकत होता वनांत ।।५७।। तेव्हां त्यास साप चावला । विषप्रभावें व्यथित झाला । भयभीत तो मूर्च्छित पडला । चंद्रोदयीं जाग त्यांस आली ।।५८।। त्या समयीं जें अन्न मिळत । तेचि भक्षिलें होऊन मुदित । परी गरळाच्या प्रभावें पडत। बेशुद्ध होऊन भूवरी तो ।।५९।। पंचमी दिनीं तो मरत । परी व्रत घडलें नकळत । म्हणोनी होऊन ब्रह्मभूत । मुक्त झाला तो महापापी ।।६०।। ऐशाचि परी अन्य जन । व्रतप्रभावें होऊन पावन । स्वानंदवासी होऊन। ब्रह्मभूत जाहले ।।६१।। ऐसें हें कार्तिक संकष्टीचें महिमान । कथिलें तुज पावन । हें ऐकता वा वाचितां जन । इप्सित सारें लाभतील ।।६२।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते कार्तिक कृष्ण चतुर्थी माहात्म्यवर्णनं नाम एकोनत्रिंशोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकोणतीसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । मार्गशीर्ष संकष्टीचें महिमान । वसिष्ठ सांगती दशरथाप्रत प्रसन्न । इतिहास तो पुरातन । हरिश्चंद्र राजाचा ।।१।। तेजस्वी हरिश्चंद्र प्रतापवंत । अयोध्येंत राज्य करित । नानाधर्म परायण सद्गुणयुक्त । कर्मपरायण उदार दाता ।।२।। जें जें ब्राह्मण मागत । तें तें हर्षभरें तयास देत । त्याच्या पुण्याची तुलना नसत । धरातलावरी

समग्र ।।३।। त्यास पीडा देण्या जात । विश्वामित्र योगी याचक स्वरूपांत । त्यास आपुले सर्व राज्य देत । दानरूपें हरिश्चंद्र ।।४।। राज्यभ्रष्ट नृपास करित । परप्रांतींही त्यास छळित । परी तो नृप धर्मयुक्त अत्यंत । ढळला नाही अल्पांशेही ।।५।। आपुलें ब्रीद राखित । हरिश्चंद्र होता भटकत । मार्गशीर्ष संकष्टी दिनीं घडत । न कळत त्यास उपवास ।।६।। क्षुधार्त तैसा तृषार्त । हरिश्चन्द्र राजा असत । विश्वामित्र सत्त्वपरीक्षा घेत । ऐसा संपूर्ण दिन गेला ।।७।। परी चंद्रोदय होता अन्न । काही दैवयोगें मिळून । नृपें केलें तें भक्षण । पुढें एक आश्चर्य घडलें ।।८।। मार्गशीर्ष कृष्ण पंचमी उजाडली । तेव्हां एक घटना घडली । विश्वामित्राची बुद्धि जाहली । संभ्रान्त एकाएकी तेव्हां ।।९।। तें पाहून विस्मित । योगी विचार करी मनांत । संकष्टीचें व्रत नृपें केलें तें ज्ञात । होऊन वरद त्यास झाला ।।१०।। हरिश्चंद्रासी तो सांगत । महाबुद्धे ऐक वृत्तान्त । चतुर्थीचें व्रत तुझ्या राज्यांत । नष्ट झालें होतें पूर्वी ।।११।। त्यायोगें पीडा तुज प्राप्त । मीही त्या कारणें क्षोभित । सर्व कार्यारंभीं करावें हें व्रत । चार पुरुषार्थदायक ।।१२।। तूं नानाविध पुण्य केलें । तें चतुर्थीलोपें नष्ट झालें । सर्व जनांसह तुजवरी ओढवलें । नरकपाताचें भय ।।१३।। परी तूं हें मुख्य व्रत । काल केलेंस न कळत । म्हणोनी मी प्रीतियुक्त । तुज गणेशमंत्र देतों ।।१४।। अष्टाक्षर मंत्र उपदेशित । गणनाथाचा त्यास विधियुक्त । गणेशाचें स्वरूप वर्णित । प्रार्थनेस्तव हरिश्चंद्राच्या ।।१५।। राजा तूं संकष्टीचें व्रत । जरी करिशील सतत । तरी प्रजेसह सौख्यलाभ तुजप्रत । होईल यांत न संशय ।।१६।। गणेश्वराचें महिमान । सांगतों तुज मी पावन । जगीं गणेश एक सत्त्वभाव मान । सर्व त्याचे गण असती ।।१७।। मनोवाणीमय जें असत । तें विश्व गणवाचक समस्त । नाना भावें समायुक्त । वर्णन त्याचें अशक्य

असे ।।१८।। मनोवाणीविहीन । जें नाना ब्रह्मविधान । गणरूप तें पावन। ऐसें वेद सांगती ।।१९।। सिद्धि भ्रांति करी ख्यात । बुद्धि ती भ्रांतिधर असत । त्या उभयतां सवें खेळत । विघ्नेश चिंतामणि हा हृदयीं ।।२०।। त्यांस तूं विधिपूर्वक भजशील । तरी शांतिसुख लाभशील। राज्यकर्ता वंद्य होशील । योगिवन्द्य या जगांत ।।२१।। चित्त पंचविध ख्यात । त्यांत मोहही पंचविध वर्तत । त्या चित्ताचा मोहासहित। त्याग करितां चिंतामणी पद ।।२२।। ऐसें सांगून व्रताचें महिमान । सांगून त्यास अंतर्धान । विश्वामित्र जाहला प्रसन्न । हरिश्चंद्रा मोद झाला ।।२३।। अयोध्येसी तो परतत। प्रधान त्याचें स्वागत करित । प्रजाजनांसह आचरित । संकष्टीचें व्रत वरदेचें ।।२४।। हरिश्चंद्र नृप आपुल्या राज्यांत । चतुर्थीव्रत प्रशंसित। राजाज्ञेचें पालन करित । प्रजाजन सारे भक्तिभावें ।।२५।। ह्या व्रतासम कांहीं नसत । अन्य व्रत जगतांत । रोगमुक्त होऊन हर्षयुक्त । प्रजाजन सारे झाले ।।२६।। राजा गणपतीस भजत । अनन्यभावें सतत । वृद्ध होतां जात वनांत । पुत्रास राज्य देऊनियां ।।२७।। स्त्रीसहित वनांत। गणराजाचें तप करित । शांति लाभून विशेषयुक्त । योगी जाहला तो राजा ।।२८।। अन्तीं स्वानंदवासी होऊन। नृप जाहला गणेशाधीन। ऐसें हें व्रत महिमान । अन्यजनही मुक्त झाले ।।२९।। अन्यही एक वृत्तान्त । वसिष्ठ दशरथास सांगत । माळव्यांत एक असत । कर्णा नामक एक वेश्या ।।३०।। ती नरविमोहिनी अत्यंत। हावभावें भुलवी क्षणांत । स्वधर्म सोडून आसक्त । नाना जन भजती तिसी ।।३१।। आपापल्या स्त्रीस सोडून । तिच्या नादीं लागले जन । मद्य मांसांचें सेवन । करविलें त्यांसी तियेनें ।।३२।। ऐसे ब्राह्मणादि भ्रष्ट झाले। चौर्यकर्मादिकांत गुंतले । बहुविध दोष त्यांनीं केले । परदोष कथनीं दोष असे ।।३३।। ती कर्णा वेश्या पापी असत । अतिदारुण लोभी अत्यंत।

नाना जनांसह नरकाप्रत । मार्ग तिचा सुनिश्चित ।।३४।। परी एकदा ती ज्वरग्रस्त । मार्गशीर्ष कृष्ण चतुर्थी दिनांत । तापानें पोळली अत्यंत। कांहीं दिनभरी न भक्षिलें ।।३५।। परी चंद्रोदयीं अल्प खाऊन । पंचमी तिथीस मृत होऊन । नकळत घडलें व्रत महान । त्या पुण्ये ती मुक्त झाली ।।३६।। तिच्यासम अन्य जन जे आचरित । चतुर्थी तेही मुक्त होत । होऊनियां ब्रह्मभूत । प्रभाव वर्णनातीत ऐसा ।।३७।। मार्गशीर्ष चतुर्थीचें महिमान । ऐकतां वाचितां पुण्यपावन । सर्वसिद्धि लाभतील जन । चिंतामणीच्या कृपाप्रसादें ।।३८।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते मार्गशीर्ष कृष्ण चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम त्रिंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ विचारी वसिष्ठाप्रत । पौष कृष्णचतुर्थीचें व्रत । कैसें जाहलें प्रख्यात । ती सर्व कथा मज सांगा ।।१।। वसिष्ठ तेव्हां सांगत । इतिहास पुरातन तयाप्रत । वीरसह राजा हस्तिनापुरांत । धर्मशील श्रेष्ठ होता ।।२।। धर्मशील नानाशास्त्र निष्णात । मान्यवर तो बलवंत । नाना दानें याचका देत । परी नव्हतें त्यास संतान ।।३।। त्यासाठीं प्रयत्न करित । देवसेवा करी भक्तियुक्त । पुत्रकामेष्टि यज्ञ करवित । ब्राह्मणांकरवीं त्यासाठीं ।।४।। परी त्यास वंशवर्धनार्थ न होत । इच्छित ऐसा सुत । तीर्थक्षेत्रादिक फिरत । परी संततीलाभ नसे ।।५।। तेव्हां होऊन अतिदुःखित । राज्य सोडून जाई वनांत । स्त्रीसहित भ्रमण करित । थंडी वारा उन्हांत ।।६।। महावनांत तो जात । दुःखशोक निमग्न अत्यंत । सिंह वाघ जेथ फिरत । तेथही फिरे भयहीन ।।७।।

तेथ त्रित नामा महामुनी येत । योगींद्र एक अवचित । त्यास नमस्कार करून जोडित । करांजली भक्तीनें ।।८।। त्यानें विचारितां कथित । सर्वही आपुला वृत्तान्त । महायश तो रुदन करित । करुणापूर्वक त्या वेळीं ।।९।। तो ऐकून वृत्तान्त । तयासी म्हणें तो त्रित । चतुर्थीचें नष्ट व्रत । तुझ्या राज्यांत महिपाला ।।१०।। जरी तूं नाना धर्मरत । परी मुख्य चतुर्थीचें व्रत । विसरलास जें चतुर्वर्ग देत । तें न करतां नरकप्राप्ती ।।११।। ऐसें सांगून मुनिसत्तम । सांगे माहात्म्य अनुपम । वीरसह तें ऐकून मनोरम । म्हणे मी आराधीन गणेशाला ।।१२।। त्या गणेशाचें स्वरूप मजप्रत । आणखी सांगावें विस्तृत । अशक्य वर्णन करण्या असत । म्हणे त्रित तयासी ।।१३।। परी उपाधियुक्त सांगतों । माझाच वृत्तान्त कथितों । पूर्वी मी करीत होतों । तप:साधना अत्यंत ।।१४।। शापानुग्रहणीं शक्ति लाभत । एक द्विजबंधु विद्यायुक्त । त्यांच्यासह एकदा जात । नृपसदनीं यज्ञ करण्या ।।१५।। तो यज्ञ करवून परतत । जेव्हां मी स्वगृहाप्रत । दक्षिणा पशुधनांनी युक्त । विपुल प्राप्तीसह अन्यही ।।१६।। तेव्हां वनांतरी मार्गांत । माझे भाऊ एक द्विज जात । मजला लकटून एका कूपांत । निघून गेले स्वगृहीं ।।१७।। जलहीन त्या कूपांत । मी पडलों खेदयुक्त । तेथ मानसिक यज्ञ करित । हितावह जो संकटीं ।।१८।। देवादिक जे आहूत । ते सर्वही तेथ येत । हविर्भाग स्वीकारण्या इच्छित । मानसपूजा केली मीं ।।१९।। ते सर्वही होऊन तृप्त । मजला वर देत ईप्सित । कूपाबाहेर काढून जात । सकल देव परतून ।।२०।। नंतर अन्य नृपाजवळ याचना । करुनी पुरविली कामना । मिळवून प्रभूत धना । गोधनही अपार ।।२१।। हर्षभरें आश्रमाप्रत । आपल्या परतलों त्वरित । तप आचरिलें उग्र अत्यंत । त्यायोगें ज्ञान मज झालें ।।२२।। तप सोडून भूमिसाधक । जडोन्मत्त पिशाच्चादिक ।

भूमि साधिल्या निःशंक । अंतीं ब्रह्मगत मी जाहलों ।।२३।। समात्मा मीं स्वशांतिद आश्रमांत । आपुल्या होतों हर्षयुक्त । तेव्हां मुद्गल मुनि येत । धर्मशील जे पवित्र ।।२४।। माननीयांत मान्यवर । पवित्र जैसे उदार । प्रणाम करून तो योगींद्र । स्तविला मी श्रद्धाभावें ।।२५।। म्हणें मीं तयासी विनीत । हात जोडून भक्तिभावयुक्त । शांतियोग सांगावा मजप्रत । शांतिलाभ होय तेणें ।।२६।। मुद्गल तेव्हां सांगत । असत् शक्ति सूर्य सत् असत । विष्णु समभावयुक्त । अव्यक्त त्यामाजीं शंकर ।।२७।। त्यांच्या संयोगें गणप होत । संयोगें मायायुक्त उदात्त । ब्रह्मनायक गणेश असत । अयोगांत मायाहीन ।।२८।। संयोग अयोग यांच्या योगांत । गणेशयोग असे ख्यात । शांतिप्रद शांतीसीही तो ज्ञात । त्यास भज तूं भक्तिभावें ।।२९।। ऐसें सांगून मुद्गल देत । एकाक्षर मंत्र विधियुक्त । नंतर अंतर्हित होत । गणराजभक्ति मीं करूं लागलों ।।३०।। सर्वभावें त्यास भजत । तेणें शांति लाभत । मज कुठलें भय बाधत । गणेशाहून अन्य ब्रह्म नसे ।।३१।। गणेशाहून अन्य तप नसत । नसे कर्म वा ज्ञान जगांत । गणेशाहून जें श्रेष्ठ असत । ऐसें जगीं कांहीं नसे ।।३२।। योग तैसी भक्ति नसत । त्या गणेशाहून श्रेष्ठ विश्वांत । म्हणोनि सर्वांसी पूज्य ख्यात । सर्व कार्यांत सिद्धिप्रद ।।३३।। गणेशानासी त्यागून । कर्म ज्ञानादिक अपावन । निष्फळ सारें तें मान । भस्मांत आहुती दिल्यापरी ।।३४।। ऐसें बोलून तयाप्रत । त्रितमुनि दशाक्षर मंत्र देत । विधिपूर्वक तो पुनीत । नंतर अन्तर्धान पावला ।।३५।। राजा वीरसह हर्षभरित । आपुल्या नगरासी परतून जात । प्रधान त्यांचें स्वागत करित । गणेशास आराधिती ।।३६।। तदनंतर जी प्रथम येत । पौष कृष्ण चतुर्थी त्या दिनीं व्रत । संकष्टीचें नृप करित । समस्त प्रजाजनांसमवेत ।।३७।। ह्या व्रताची प्रशंसा करित । चतुर्थीव्रत जगीं

ख्यात । सर्व जन तें आचरित । जैसा राजा तैसी प्रजा ।।३८।। नंतर वीरसह नृपास । महाशूर पुत्र होऊन विशेष । नीतिज्ञ धर्मसंयुत जो जनांस। तोषवी आपल्या गुणांनीं ।।३९।। रोगहीन प्रजा समस्त । हृष्ट पुष्ट जन होत । जेथ तेथ प्रेमें वर्णित । चतुर्थी माहात्म्य सकलजन ।।४०।। वीरसह नृप राहिला सुखांत । वृद्ध होतां जात वनांत । पुत्रावरी राज्य सोपवित । निवृत्तिपूर्वक त्या वेळीं ।।४१।। स्त्रीसहित जाऊन वनांत । गणनाथासी तो भजत । अंतीं ब्रह्ममय तो होत । व्रतपुण्याच्या प्रभावानें ।।४२।। क्रमानें सारे ब्रह्मभूत । जाहले ऐसें व्रत माहात्म्य अद्भुत । दुसराही असे एक वृत्तान्त । पापनाशक महान ।।४३।। गौड देशांत वाणी असत । एक पापी लोभयुक्त । द्रव्यासाठी विष देऊन मारित । प्रत्यक्ष आपुल्या पित्याला ।।४४।। आपुल्या आईसही मारिलें । अन्य जनांसही ठार केलें । विषप्रयोगें त्यानें मारिले । असंख्य लोक सर्वकाळ ।।४५।। त्यांचें धन लुबाडून । आपण झाला अतिसधन । परस्त्रीलालस होऊन । सतीस भ्रष्ट करूं पाहे ।।४६।। मद्यमांस तो सेवित । नाना मिषें दूषवित । परस्त्रियांसी भोगित । शेवटीं राजा पकडी तया ।।४७।। राजाज्ञेनें बंदिस्त । शिपाई मार देती निष्ठुरचित्त । पायांत बेड्या ठोकित । ऐसा जाहला तो कैदी ।।४८।। त्या दिवशीं दैवयोगें असत । पौष कृष्ण चतुर्थी पुनीत । त्या संपूर्ण दिनीं तयास घडत । उपवास योगायोगें ।।४९।। परी चंद्रोदय झाल्यावर । रक्षकें दिलें कदान्न समग्र । तें भक्षून करी विचार । कैसी सुटका होणार ।।५०।। परी त्याची सुटका न होत । पंचमी तिथि उजाडत । राजदूत त्यास सुळीं चढवित । ऐशापरी अंत झाला ।।५१।। परी तो व्रतपुण्यें ब्रह्मभूत । नकळत घडले जरी व्रत । संकष्टीचें माहात्म्य अद्भुत । अशक्य वर्णन विस्तारें ।।५२।। हें पौष संकष्टीचें माहात्म्य ऐकत । अथवा हें वाचील

श्रद्धायुत । त्यासी शुभलाभ निरंतर होत । ऐसा आधार ग्रंथींचा ।।५३।।
ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते पौष कृष्ण चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नामैकत्रिंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । अधिक मासांत जी संकष्टी येत । तिचें माहात्म्य सांगा मजप्रत । गणेश कथा ऐकून तृप्त । अद्यापि ना झालें मन ।।१।। ऐसी दशरथाची प्रार्थना ऐकत । तेव्हां वसिष्ठ तयासी सांगत । आंध्र देशी राजा धर्मदत्त । होता धर्मपरायण ।।२।। यज्ञयाग तो बहु करित । नीतिज्ञ अखिलास तोषवित । प्रजेपासून षष्ठांशच घेत । सर्वशास्त्र पारंगत ।।३।। परी त्यासी व्याधी जडत । जलोदर रोगाची अकस्मात । अतिपापें तो पीडित । सार्वभौम भूमिपाल ।।४।। नाना उपाय तो करित । परी रोगमुक्ति ना प्राप्त । तुलादानादिक करित । महादानें तो भक्तीनें ।।५।। तीर्थयात्रा हिंडत । देवता आराधन विधियुक्त । तथापि न होय रोगवर्जित । अति दुःखित मानसीं ।।६।। आत्महत्या करण्या उद्युक्त । जाहला नृप तैं प्रजा दुःखित । तेव्हां महायोगी अष्टावक्र येत । अकस्मात राजगृहीं ।।७।। विषप्राशनाचा बेत । नृपानें दूर ठेवून सांप्रत । अष्टावक्र पूजा विधियुक्त । करून भोजन दिलें तयासी ।।८।। नंतर प्रणाम करून विनवित । धन्य माझा जन्म वाटत । तुमच्या दर्शनें योगेश्वरा उदात्त । जीवन धन्य मज वाटतें ।।९।। मी आत्मघातास उद्युक्त । जाहला होता संभ्रम । आतां होऊन दर्शन तुमचें पुनीत । नरकापासून वाचलों मी ।।१०।। हें ऐकता वर्तमान । अष्टावक्र विचारी प्रसन्नमन । महाराजा देहघाता मन । कोणत्या कारणास्तव झालें? ।।११।। तू रोगदुःखमुक्त ।

होशील ह्यांत संशय नसत । तुझा जाणला मीं वृत्तान्त । चतुर्थीव्रत विसरलासी ।।१२।। राष्ट्राकडून पाप झालें । तैसेंचि तें तव हस्तें घडलें । चतुर्थीव्रतहीनत्वें आलें । पतितत्व नराधमा तुला ।।१३।। सर्व व्रतांत मुख्य मानावें । चतुर्थीचें व्रत बरवें । तें न करता भोगावें । पापाचें फळ आपुल्या ।।१४।। म्हणोनी आता प्रजेसहित । पडशील तूं नरकांत । जरी वाचण्या इच्छा असत । तरी हें व्रत राज्यांत करी ।।१५।। ऐसें बोलून चतुर्थीमाहात्म्य वर्णित । अष्टावक्र करुणायुक्त । तें ऐकून सुविस्मित । धर्मदत्त म्हणे तयासी ।।१६।। पुण्यपावन हें व्रत । पूर्व पुण्यें कळलें मजप्रत । आतां गणेशस्वरूप उदात्त । दयानिधे वर्णन करी ।।१७।। त्या देवासी सदैव पूजीन । मुनींद्रा मी अनन्य मन । त्या देवाधिपाचें महिमान । असामान्य मज वाटतें ।।१८।। अष्टावक्र सांगे तयाप्रत । महाभागा ऐक उचित । सर्वसिद्धिप्रद असत । स्वरूप त्या गणेशाचें ।।१९।। निर्गुण गजवाचक वर्तत । जें ब्रह्म तें मस्तक असत । त्याचा देह सगुण ख्यात । योगरूप गजानन ।।२०।। सिद्धि ती भ्रांतिरूप । बुद्धि भ्रांतिधरा अपाप । त्यांच्या साधनें खेळे विघ्नप । मायासाहाय्यें सत्य हें ।।२१।। स्वसंवेद्ययोगें लाभत । दर्शन त्याचें महान उदात्त । त्या कारणें योगी वर्णित । स्वानंदवासी प्रभु ऐसें ।।२२।। संयोगांत हा गकार । योगांत आहे णकार । त्यांचा स्वामी तो थोर । गणेशान विघ्नेश्वर ।।२३।। शांतियोगें तो लाभत । पंचधा चित्तवृत्ति जी असत । वृत्तीसह मोहही असत । पंचधा हे जाणावे ।।२४।। ऐशा विचारें चित्त त्यागून । चित्तचालक लाभे पावन । म्हणोनि हा गणनाथ महान । चिंतामणि नामें ख्यात ।।२५।। त्यास भज तूं महाभागा आतां । त्यायोगें शांति लाभे भक्ता । शांत होऊनिया जगता । पूजनीय तूं होशील ।।२६।। ऐसें सांगून त्यास देत । गणेश माला मंत्र उदात्त । विधिपूर्वक

नंतर होत । अंतर्धान अष्टावक्र ।।२७।। धर्मदत्त राजा हर्षयुक्त । आपणासी धन्य मानीत । भाग्यगौरवें उत्साहयुक्त । मलमास कृष्ण चतुर्थी करी ।।२८।। प्रजाजनांसमवेत आचरित । नृप तेव्हां संकष्टीचें व्रत । व्रतमुख्यत्वें प्रसिद्ध करित । पृथ्वीवरी सर्वत्र ।।२९।। त्यायोगें रोगविनिर्मुक्त । धर्मदत्त राजा त्वरित । प्रजाजनही समस्त । झाले निरामय प्रसन्न ।।३०।। राजा नित्य गणपतीस भजत । अनन्यचित्त भक्त । गणेशप्रीतिस्तव देत । नानाविध दानें तो ।।३१।। नंतर राज्यावर स्वपुत्रास । बसवून भोगी एकांतवास । स्त्रीसहित ध्यानमार्गास । अवलंबिले भजनार्थ ।।३२।। अंतीं विघ्नेशाप्रत जात । तल्लीन झाला भक्तिरत । जन सर्वही ब्रह्मभूत । क्रमाक्रमानें जाहले ।।३३।। ऐसें ह्या व्रताचें माहात्म्य कथिलें । दुसरेही असे वृत्त भलें । तें आतां पाहिजे श्रवण केलें । मुक्तिप्रद कथानक ।।३४।। गांधार देशांत क्षत्रिय राहात । पापी परद्रव्यहारक चौर्यरत । द्युतमद्यासक्त परस्त्रीलंपट । गोमांसभक्षक असत्यपर ।।३५।। तो दुर्बुद्धि कलह सतत । हिंसाकर्म सदा आचरित । तेव्हां राजा त्यास करित । घोर वनीं हद्दपार ।।३६।। वनांत वाटमारी करित । ब्राह्मणांदीसी ठार मारित । स्त्रियांचाही वध भयरहित । पापी दुष्ट तो नित्य करी ।।३७।। नंतर द्रव्य जोडून अपार । भोगिले भोग अपार । नाना चोऱ्या करून उग्र । त्या दुष्ट पातक्यानें ।।३८।। पुढें एकदा मलमासीं जात । तो पापी एका पर्वतद्रोणींत । कृष्ण चतुर्थी ती असत । हिंसार्थ लोभी त्या वेळीं ।।३९।। नंतर एक मार्गस्थ पाहत । मानव तो अवचित । शस्त्रधारी तो धावत । वधार्थ त्याच्या त्या समयीं ।।४०।। त्या क्रूरकर्म्यास पाहून । तो वाटसरू करी पलायन । कोसभरी तो पापी मागें लागुनी । पडला मार्गात अडखळून ।।४१।। त्यास पडलेला पाहत । तेव्हां वाटसरू क्रोधें हाणित । एक पाषाण क्रोधयुक्त ।

मस्तकावरी त्याच्या तैं ।।४२।। त्यायोगें त्या पाप्याचें फुटत । क्षत्रियाचें मस्तक क्षणांत । त्या कारण व्याकुळ अत्यंत । शुद्ध हरपली तयाची ।।४३।। रात्रीं चंद्रोदयापर्यंत । तो तैसाचि बेशुद्ध पडत । परी चंद्रोदयानंतर सावध होत । स्वल्प पायस पान करी ।।४४।। नंतर दुसरे दिनीं पंचमी असत । तेव्हां तो प्राण सोडित । स्वानंदपुरीं जात । गणेशास पाहून मुक्त झाला ।।४५।। तो पापकर्मा क्षत्रिय होत । व्रतप्रभावें ब्रह्मभूत । नकळत जेव्हां त्यास घडत । संकष्टीचा उपवास ।।४६।। तरी ज्ञानपूर्वक करिती व्रत । त्यांचे पुण्य अगणित । नानाजन भोगित । व्रतप्रभावें हृदयेप्सित ।।४७।। अन्तीं ते ब्रह्मभूत होत । ऐसा महिमा अगाध असत । मलमास संकष्टीचा पुनीत । ऐकतां वाचितां इष्टलाभ ।।४८।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते मलमास कृष्णपक्ष चतुर्थीमाहात्म्यवर्णनं नाम द्वात्रिंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय बत्तिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दशरथ विनवी वसिष्ठाप्रत । शमीमूलीं राहून करित । मुनिसत्तमा जी संकष्टी पुनीत । तिचें माहात्म्य मज सांगा ।।१।। इतिहास पुरातन तदनंतर । वसिष्ठ सांगती सर्वसिद्धिकर । श्रवणें पठणें मुक्तिकर । दशरथ नृपासी त्या समयीं ।।२।। पांचाल देशांत अत्रिगोत्रोत्पन्न । होता एक कुब्ज अंध ब्राह्मण । पूर्वकर्माच्या विपाकेंकरून। कोड उठलें शरीरीं त्याच्या ।।३।। नाना क्षतें पडलीं । पूय शोणित वाहून उबग आली । कीटकांची गर्दी झाली । अंगाभोवतीं तयाच्या ।।४।। त्यास पाहून ऐसा त्रस्त । पिता त्याचा परम दुःखित । अत्रि ऋषीस शरण जात । उपाय विचारी तयासी ।।५।। त्यानेंही सांगितला उपाय ।

शमीमूली राहून भक्तिमय । संकष्टी चतुर्थी करता जाय । पाप समग्रही विलयासी ।।६।। तदनंतर पिता स्वसुतास नेत । शमीमूलीं व्रताचरणास । दाव्यानें बांधून त्यास । चन्द्रोदयापर्यंत ठेविलें ।।७।। सूर्योदयापासून बंदिस्त । तो कुष्ठरोगी तेथ राहत । चन्द्रोदयापर्यंत । कांहीं न त्यानें भक्षण केलें ।।८।। नंतर पिता त्यास आणित । व्रत पूर्ण होतां आपुल्या गृहाप्रत । तेव्हां तो जाहला नेत्रयुक्त । रोग सारा नष्ट झाला ।।९।। कुब्जताहीन रूप पावला । विगतज्वर तो जाहला । कोडव्याधीतून मुक्तता त्याला । सर्वांग सुंदर जाहलें ।।१०।। तें पाहून आश्चर्यचकित । तेथ जाहले विप्र समस्त । तदनंतर गणेशासी भजत । सातत्यानें आदरें तो ।।११।। अन्तीं शांतिलाभ होत । तो जाहला ब्रह्मभूत। ऐशा परी शमीमूलांत । संकष्टी व्रत करितां पुण्य ।।१२।। अन्ती ब्रह्मभूत होत। असाध्य सारे साध्य होत । अन्यही एक वृत्तान्त । महीपाला याविषयीं ।।१३।। तो आता ऐक सिद्धिकर । नगरी पापी एक चोर। घर फोडून सत्वर । धन हरण्या उद्युक्त एके दिनीं ।।१४।। धन घेऊन तो बाहेर पडत । तेव्हां जन त्यासी पाहत । कोलाहल करिती जो ऐकत। राजदूत त्या वेळीं ।।१५।। शस्त्र घेऊन हातात । धावले ते महाबलवंत। चित्तीं क्रोध दाटला बहुत । विद्ध करिती शस्त्रांनी ।।१६।। त्या चोराचें अंग छिन्न । जाहलें तेव्हां तो उन्मन । त्यास नेती दूत पकडून । बांधून ठेविती शमीमुळाशी ।।१७।। नंतर राजासी निवेदिती । ती संकष्टी चतुर्थी होती । त्या दिवशीं त्या चोराची स्थिति । निराहारत्वें व्याकुळ ।।१८।। पंचमी तिथी उजाडत । तेव्हां सर्व क्षतें भरून निघत । चोर जाहला शोभायुक्त। राजदूत तें पाहती ।।१९।। राजासी ते निवेदिती । आश्चर्य घडलें म्हणती। राजा येऊन त्याच्यापुढतीं । जाहला विनम्र प्रणाम करून ।।२०।। एवढ्यांत विमान एक उतरत । गणेशगण बाहेर पडत । शुंडादंडे विराजित । तेही

त्यासी प्रणाम करिती ।।२१।। त्या पापी चोरास नेण्यास । उत्सुक ते होते विशेष । महासेन नृप विचारी तयास । यानें काय पुण्य केलें ।।२२।। गणपति दूतांनो सांगा मजसी । करुणा युक्त हृदयें वृत्तांताशी। आम्हींही करूं त्या व्रतासी । पुण्यपावन जें एवढें ।।२३।। गणेशदूत तेव्हां सांगती । कृष्णपक्षीं संकष्टी होती । त्या दिनीं शमीमूळीं वसती। घडली त्यास अनायासें ।।२४।। सूर्योदयापासून चन्द्रोदयापर्यंत । निराहार जो ऐसा राहत । विघ्नेशाचा जप करित । व्रत सारें यथाविधि ।।२५।। नंतर ब्राह्मणांस देऊन भोजन । स्वयं करी जो भक्षण । रात्रीं करी जागरण । पंचमीस पूजन पुनः करी ।।२६।। तो गणराजाचा भक्त । पावेल सारें ईप्सित । संशय यात अल्पही नसत । अन्तीं जात स्वानंदलोकीं ।।२७।। तेथ होऊन ब्रह्मभूत । मुक्त होय तो गणेश भक्त । ऐसें सांगून गणेशदूत । त्या चोरासी घेऊन जाती ।।२८।। विघ्नेश्वराचें होतां दर्शन । चोर जाहला पावन । ब्रह्मभूतत्व पावून । धन्य जाहला तो जगीं ।।२९।। नंतर राजा महाभाग आसक्त । जाहला गणेशभजनांत । शमीमूळीं राहत । संकष्टी चतुर्थीचें दिवशीं ।।३०।। त्यायोगें राजा गति लाभत । व्रतपुण्यें त्रैलोक्यांत । ब्रह्मादींच्या सभेंत । जाऊन बैसत स्वेच्छेनें ।।३१।। पुनरपि स्वनगरांत परतत । चंपावती नामें ती ख्यात । ऐसा सर्वगामी होऊन शोभत । राजमंडळीं तो नृप ।।३२।। अन्तीं सर्व जनांसहित । राजा गेला विघ्नराजाप्रत । होऊनिया ब्रह्मभूत । ऐसें माहात्म्य या संकष्टीचें ।।३३।। शमीमूल संकष्टीचें महिमान । कथिलें तुज पावन । जो ऐकेल वा वाचील प्रतिदिन । ईप्सित सारें तो लाभेल ।।३४।। ऐसा गणराजाचा प्रसाद लाभत । नाना जन झाले पुनीत । वंध्यादि दोष विलया जात । त्यांची गणना अशक्य वाटे ।।३५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि

श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते शमीमूल चतुर्थीव्रताचरणवर्णनं नाम त्रयस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तेहतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । श्रावणमासीं लाडु आदि भक्षित । जो ब्राह्मण विधियुक्त । त्या व्रताचें माहात्म्य मजप्रत । सांगावें कृपा करून ।।१।। ऐसे दशरथ राजा प्रार्थित । तेव्हां वसिष्ठ त्यास सांगत । वैवस्वत मनूचा एक सुत । इक्ष्वाकु नामा कनिष्ठ ।।२।। तो राज्य लोभी व्रत करित । भक्षण करी श्रावण महिन्यांत । संकष्टी व्रताच्या आचरणांत । पंचखाद्यांचे लाडू तेव्हां ।।३।। सप्तभावें साधनतप्तर । दही खाऊन राही भक्तिपर । भाद्रपद कृष्ण चतुर्थीस तो उदार । आश्विनी संकष्टी निर्जला करी ।।४।। कार्तिकांत केवळ दुग्धसेवन । राजा पाळी तो नियम प्रसन्न । मार्गशीर्षात जल पिऊन । संकष्टी व्रत करीतसे ।।५।। पौष मासांत गोमूत्र प्राशन । माघांत पांढरे तीळ सेवन । फाल्गुनांत शर्करायुक्त भक्षण । घृताचें करी व्रतकारणें ।।६।। चैत्रांत पंचगव्याचें प्राशन । करी तो विनायकाचें पूजन । वैशाखांत कमलबीज खाऊन । व्रत पालन तो करीतसे ।।७।। ज्येष्ठांत गाईचें तूप खाई । व्रत उत्तम पूर्णत्वा नेई । आषाढांत मध भक्षून राही । गणेशास पूजून चंद्रोदयीं ।।८।। नंतर त्या व्रताच्या प्रभावें होत । सुद्युम्न मनुपुत्र ज्येष्ठ नृप जगांत । इलास त्या आद्य मुनि करित । राजा आपुला आदरयुक्त ।।९।। मनु इक्ष्वाकु ऐशापरी होत । सार्वभौम महाद्युती पुनीत । असाध्य जरी मानव इच्छित । तरी तेंही प्राप्त धर्म मार्गानें ।।१०।। ऐशापरी नानाजन । व्रतपुण्यें झाले पावन । ब्रह्मभूत ते होऊन । शोभले या भूमंडळीं ।।११।। म्हणोनि राजशार्दूला तूं सांप्रत । पापरूपा मज वाटत । चतुर्थीचे नष्ट व्रत । तुझिया राज्यीं परी न जाणसी

।।१२।। प्रजाजनांसमवेत । जर करशील तूं हें व्रत । होऊनियां पुत्रवंत । अन्तीं विघ्नेशसरूपता ।।१३।। मुद्गल म्हणती दक्षाप्रत । ऐसें ऐकून वसिष्ठवचन यथायुक्त । दशरथ महाराजा प्रणाम करित । वसिष्ठांसी आदरें ।।१४।। नंतर स्वपुरीं परतत । प्रजेसह व्रत आचरित । दवंडी करी स्वराज्यांत । म्हणे करा हें व्रत देवाचें ।।१५।। त्या राजाज्ञेचें करिती पालन । व्रत हें संकष्टीचें पाळून । व्रतपुण्यप्रभावें सुजाण । साक्षात् विष्णु तो झाला ।।१६।। त्याचे चार पुत्र प्रख्यात । राम लक्ष्मण भरत ज्ञात । शत्रुघ्न चवथा असत । बलसंयुत सर्वही ते ।।१७।। दशरथ अन्तीं विघ्नेशाप्रत । व्रत पुण्याईनें जात । लोक झाले दुःखरहित । ब्रह्मभूत झाले सर्वही ।।१८।। वसिष्ठ दशरथांचा हा संवाद । व्रतहेतुक जो ऐकेल सुखद । अथवा वाचील पुण्यप्रद । विघ्नेश्वर त्यास देई फल ।।१९।। पुत्रपौत्रादिक धनधान्य संपत्ती । देई त्यासी गणपति । नाना रोगांतून मुक्ती । ऐश्वर्यही समग्र लाभे ।।२०।। अन्ती गणपतींत लीन । होतो भक्त तो महान । यांत संशय नसे पावन । संपूर्ण हें कथानक ।।२१।। चतुर्थ्यांचा वृत्तान्त । महिम्यासह कथिला तुजप्रत । आतां आणखी काय ऐकण्या चित्त । इच्छित तुझें तें सांग ।।२२।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते वसिष्ठदशरथसंवादसमाप्तिवर्णनं नाम चतुस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चौतीसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । दक्ष म्हणे मुद्गलाप्रत । कथिलें आपण चतुर्थीचें व्रत । आतां उद्यापन विधि मजप्रत । सांगावा जो फलप्रद ।।१।। मुद्गल तेव्हां त्यास सांगती । उद्यापनाची रीती । व्रतारंभीं कोणीं करिती । अथवा

व्रतमध्यांत ।।२।। भाद्रमासीं शुक्ल पक्षांत । चतुर्थीचें उद्यापन उक्त । माघमासीं कृष्ण पक्षांत । करावें उद्यापन शास्त्राधारें ।।३।। असतां वैभव उपासकाचें । त्यानें खांब आणावे केळीचे । महामंडप करून तयांचें । तेज वाढवावें सर्वथा ।।४।। शोभा उत्तम करावी । द्रव्य असून कृपणता न दाखवावी । यथावैभव आचरावी । उद्यापनाची ही रीती ।।५।। छत बांधावें उत्तम । तैसेचि आरसे मनोरम । लावून सर्वत्र दीपमाला अभिराम । मणिमोत्यांची आरास ।।६।। यथायोग्य व्रतधारकें करावी । सर्व शोभा ऐसी बरवी । शुक्लचतुर्थीव्रत सांगता करावी । माध्यान्ह काळीं दक्ष प्रजापते ।।७।। कृष्ण चतुर्थीचें उद्यापन । चन्द्रोदयीं करावें प्रसन्न । गोमयानें जमीन सारवून । त्यावरी रचावी धान्यराशी ।।८।। त्या धान्यराशीवरी अष्टदल कमळ । काढून त्या वर कलश निर्मल। सुवर्णाचा, रुप्याचा, तांब्याचा यथाबळ । मृण्मय कलशही स्थापावा ।।९।। दक्षा त्या कलाशास वेष्टावें । दोन वस्त्रांनीं भक्तिभावें। त्यावरती मग ठेवावें । सुवर्णाचें पात्र उत्तम ।।१०।। त्यानंतर गणेशाचें यंत्र काढावें । वस्त्रावरी एका बरवें । तेथ गणपतिमूर्ति स्थापून पूजावें। सर्वावयव धातुयुक्तरूप ।।११।। अनेक विंशति संख्य ब्राह्मण। बोलावून करावें पूजन । गणानां त्वा या मंत्राचा जप करून । होम करावा तदनंतर ।।१२।। हजार अथवा अर्धभाग । एकशें आठ अथवा जपाचा भाग। होमीं अर्पून गीतवाद्यादिक सुभग । दक्षा, वेदघोष करवावा ।।१३।। नंतर नानाशास्त्र प्रवाद । ब्राह्मणांनी करावे सुखद । जेथ तेथ गणेशकथा मोदप्रद । सांगाव्या त्यांनीं प्रेमानें ।।१४।। नंतर पूर्णाहूती द्यावी । वसुधारा वाहवावी । बलिदान वायनादिक करावीं । समग्र विधिपूर्वक ।।१५।। एकवीस पक्वान्नें करून । एकवीस संख्या प्रमाण । नैवेद्य देवास दाखवून । ब्राह्मण भोजन घालावें ।।१६।। विपुल दक्षिणा देऊन ।

सपत्नीक ब्राह्मणा बोलावून । स्त्रीजनांस कंचुकीप्रदान । भूषणदानही करावें ।।१७।। कृष्ण चतुर्थीस अर्घ्यदान । करावें चंद्रास प्रसन्न । शुक्ल चतुर्थीस अर्घ्य वर्जित । चंद्रपुजन करावें ।।१८।। प्रथम तिथीस अर्घ्यदान । नंतर विघ्नेश्वरा समर्पण । त्यानंतर चन्द्रास अर्घ्यदान । मंत्रपूर्वक तदनंतर ।।१९।। तिथींची माता तूं अससी । देवी सर्वार्थ तूं देसी । माझे अर्घ्य स्वीकारून मजसी । पावन करी नमन तुला ।।२०।। ऐसें तिथीस प्रार्थावें । तदनंतर गजाननासी विनवावें । गजानना नमन तुज मनोभावें । नाना सिद्धिप्रदायका ।।२१।। बुद्धिपते अर्घ्य स्वीकारावा । मी दिलेला हा शुभप्रद मानावा । अत्रिगोत्रसमुद्भुत देवा । विनवावें नंतर चन्द्रासी ।।२२।। गणेशप्रीतिवर्धका घ्यावा । मी दिलेला अर्घ्य हा बरवा । रोहिणीत अमृतधारका द्यावा । मजला सर्व सौख्य ठेवा ।।२३।। कृष्णपक्षीं सदा रात्रीं भोजन । करावें व्रत साधकानें पुनीत मन । शुक्ल पक्षांत पंचमी तिथीस बोलावून । ब्राह्मणांसी भोजन द्यावें ।।२४।। चतुर्थीस जागरण करावें । गणेशकथांचें गायन व्हावें । पंचमीस पूर्ववत पूजावें । नैवद्यादींनीं महामते ।।२५।। दीन अंध कृपणांस अन्नादिक । द्यावें यथाशक्ति नि:शंक । ब्राह्मणांसी दक्षिणादिक । दान करावें श्रद्धेने ।।२६।। सर्वांस भोजन घालून । तोषवावें देऊनियां दान । गणेशभक्ति दृढ व्हावी हें वरदान । मागावें त्यांच्याजवळीं तैं ।।२७।। नंतर नमस्कारासहित । मूर्ति ती द्यावी स्वगुरूप्रत । एकवीस ब्राह्मणां भक्तियुत । कलश द्यावे त्या वेळीं ।।२८।। संतोषें उदारचित्तें सर्वांस । क्षमाभावें प्रार्थुन मनास । ध्यास लागावा सुरस । गणपतिभजनाचा सर्वदा ।।२९।। अनन्यभावें करावें मनन । ऐसें उद्यापन करून । अन्तीं संपूर्ण फल लाभून । ब्रह्मभूत तो भक्त होय ।।३०।। दक्षा या व्रताचें महिमान । वर्णन करण्या अशक्य मान । परी उद्यापनासहित विशेषें कथून । उपकृत

केलें यथामती ।।३१।। ऐसें हें चतुर्थीचें चरित । जो नर ऐकत अथवा वाचित । त्यास विघ्नेश सदा देत । मानसेप्सित सर्वदा ।।३२।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते चतुर्थ्युद्यापननिरूपणं नाम पंचत्रिंशोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पस्तिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । दक्ष म्हणे मुद्गलासी । चतुर्थी माहात्म्य कथिलेंत मजसी । कृतकृत्यता वाटे मजसी । त्यायोगें मुनिसत्तमा ।।१।। आतां लोभासुराचें शमन । कैसें करी गजानन । ते चरित्र अत्युत्तम । सर्वसिद्धिप्रद मज सांगा ।।२।। तेव्हां मुद्गल सांगती तयाप्रत । पुरातन इतिहासाचें वृत्त । एकदा पर्वत श्रेष्ठावर स्थित । कैलासीं होते शंकर ।।३।। पार्वतीसहित गणांनीं युक्त । तेथ पौलस्त्य कुबेर येत । गिरिजेसहित शंकरासी नमित । नम्र राहिला पुढें उभा ।।४।। नंतर शंकरासमीप जाऊन । चवरी हातात धरून । वारा घालून करी विनम्र मन । सेवा शिवशंकराची ।।५।। त्या वेळीं तो जवळून पाहत । पर्वत नंदिनीचें रूप अद्भुत । अप्रतिम सुंदर अवयवयुक्त । साक्षात् शक्ति मायामयी ।।६।। तिच्या सौंदर्ये मोहयुक्त । कामबाणांनी पीडित । जाहला कुबेर विह्वल अत्यंत । कामुक नजरेनें पाही तिजला ।।७।। धनाधिपाची ती नजर पाहत । पार्वती शंकरप्रिया क्रुद्ध होत । त्या रागाच्या आवेशांत । वाकडा नेत्र तो जाळिला ।।८।। कुबेर जाहला शोकाकुल । गळालें वीर्य तत्क्षणीं सबल । पुत्र जन्मला त्यांतून अमल । लज्जायुक्त कुबेर झाला ।।९।। तो महेश्वरीस प्रणाम करित । स्वत:स निंदी अत्यंत । विविध प्रकारें स्तवन करित । पार्वतीचें त्या वेळीं ।।१०।। नंतर शंकर तिचें सांत्वन करित । जगदंबिका त्या पुत्रासी पाहत । पिंगाक्ष जो प्रख्यात । पुत्रभाव प्रदर्शून ।।११।। जगदंबेस

लोभविण्यास । कुबेर उद्युक्त झाला खास । मातृगामि स्वरूपें तयास । पुत्र झाला प्रतापवन्त ।।१२।। द्विज त्या पुत्राचें नाव ठेविती । लोभ ऐसें ख्यात जगतीं । लोभसुतास घेऊन स्वगृहाप्रती । परतला तै कुबेर ।।१३।। कुबेरभवनांत लोभ राहत। हें जाणून नारदमुनि जात । वीणागायनपर ते पाताळांत । तार दानवा सन्निध ।।१४।। दानवांचें हित इच्छित । तार इंद्रहस्तें पराजित । नारद त्यास भेटत । उठून प्रणाम करी आनंदें तो ।।१५।। पूजन करून विधियुक्त । नारद कुशल वृत्तान्त । दानवांची कैसी स्थिति असत । तें सर्व सांग म्हणे ।।१६।। तार तेव्हां सांगत वृत्तान्त । इंद्रानें जिंकिलें मज रणांत । मर्दिले दानव अत्यंत । आतां काय करावें? ।।१७।। मुनिसत्तमा तें मज सांगावें । हें ऐकून नारद दैत्यहितभावें । कथन करी लोभाचें आघवें । चरित्रवृत्त तयासी ।।१८।। अलका नगरींत कुबेराप्रत । वीर्यपातें पुत्र झाला असत । लोभ नाम त्याचें असत । पळव तूं त्या पुत्रासी ।।१९।। त्या कुबेरपुत्रास आणून । करी तयाचें पालन । त्यायोगें तुझें वांच्छित महान । सर्वही सिद्ध होईल ।।२०।। ह्यांत संदेह लव नसत । तरी तूं करी आपुलें हित । ऐसें बोलून अंतर्हित । जाहले मुनिश्रेष्ठ नारद ।।२१।। तार झाला चित्तीं हर्षित । कृतकृत्य स्वत:सी मानित । मायाबळें अलकापुरींत । तार दानव पातला ।।२२।। निद्रित लोभास घेऊन । परतला स्वगृहीं आनंदून । कुबेरास कळता वर्तमान । शोक अल्पही तो न करी ।।२३।। दुर्निमित्तें जन्मला होता । म्हणोनि लोभ सुत प्रिय नव्हता । कुबेरासी परी तार दानव कृतकृत्यता । मानी त्या सुतलाभें ।।२४।। तो त्या पुत्रास आनंदें पाळित । त्याच्या बाललीला पाहून मुदित । बाळांसह लोभ खेळत । उपटी वृक्ष अनायासें ।।२५।। तळहाताचा प्रहार करित । दारुण शिला सहज फोडित। ऐसी नानाविध कर्में त्याची आश्चर्ये अघटित । दानवोत्तम पाहती ।।२६।।

तीं पाहून ते हर्षित । ऐसी चार वर्षें जात । पाचव्या वर्षीं व्रतबंध करित । वेदाध्ययन त्याचें करवी ।।२७।। शुक्रशिष्य लोभास शिकविती । वेदांची संथा देती । आसुरी महामायाही पढविती । सर्व देवविमोहिनी जी ।।२८।। सर्व विद्यांचा अभ्यास करून । लोभ झाला ज्ञानी महान । नंतर विप्रेंद्रा शुक्रास नमून । सर्वप्रद साधन विचारी ।।२९।। तेव्हां तो महामुनी तयाप्रत । पंचाक्षरी शैवी विद्या शिकवित । ती स्वीकारून विधियुक्त । लोभासुर गेला वनांत ।।३०।। तेथ शिवध्यान परायण । जप करी नित्य प्रसन्न । निराहारही राहून । भस्मांगलेप करोनी ।।३१।। शैवमार्गातें अनुसरत । शंकरासी तपें तोषवित । ऐसें अनेक दिनपर्यंत । आचरिलें तप लोभानें ।।३२।। त्याच्या शरीरावर वाढलें । वारूळ एक तेव्हां भलें । दिव्य वर्ष सहस्र केलें । तप त्यानें ऐशापरी ।।३३।। तेव्हां शंकरप्रभु प्रसन्न । पार्वतीसह आले देण्या वरदान । परी ध्यानस्था त्यास न भान । लोभासुरासी त्याचें तैं ।।३४।। शंभु त्याच्या शरीरावर । जल शिंपडती सत्वर । त्या योगें तो दानवेश्वर । समाधि त्यागून जागृत झाला ।।३५।। लोभासुर शंकरास पाहत । म्हणे धन्य माझें तप वाटत । धन्य मंत्र मातापिता जगांत । धन्य जन्म ज्ञानादि सर्व ।।३६।। आज पाहिलें तुज महेश्वरा । तूंच जगाचा निवारा । कैसें स्तवूं मी तुज उदारा । साक्षात् ब्रह्म तूं सनातन ।।३७।। तथापि तुझ्या दर्शनानें स्फुरत । माझी मति पुनीत । विश्वनाथा तुज मी नमित । सर्वांतर्यामी देवा नमन तुला ।।३८।। शंकरासी अनंतगुणराशीसी । शिवासी शक्तियुतासी । त्रिनेत्रासी महादेवासी । निर्गुण गुणचालका नमन ।।३९।। अमेय शक्तीसी गिरीशासी । वृषभध्वजासी स्रष्ट्यासी । पालनकर्त्यासी संहर्त्यासी । त्रिधारूपासी नमन ।।४०।। अकर्तुं अन्यथाकर्तुं शक्तीसी । सदा मोहविहीनासी । मुडासी स्वाधीनासी । परेशासी नमन असो ।।४१।। सहजासी खेळ करणारासी ।

शूलहस्तासी खेलकासी । कैलासवासि देवासी । भस्मलेपकरा सतत नमन ।।४२।। दिगंबरासी सर्वां सर्वदासी । नमन माझे देवा तुजसी। ऐसी स्तुति करून महेशासी । तोषविलें दानवोत्तमें ।।४३।। लोभासुर करांजली जोडून । उभा राहिला साश्रुनयन । महादेव प्रसन्न होऊन । म्हणे हृदयेप्सित माग ।।४४।। तुझ्या तपानें मी तुष्ट । तुझ्या या स्तोत्रें संतुष्ट । दानवोत्तमा तुझें इष्ट । सर्वही मीं पुरवीन ।।४५।। तूं रचिलेलें हें स्तोत्र उत्तम । मज आवडतें अनुपम । भुक्तिमुक्तिप्रदायक परम । होईल यांन ना संशय ।।४६।। जो हें स्तोत्र वाचील । दैत्येंद्रा अन्यास ऐकवील । तो माझा प्रिय होईल । लाभेल सर्व इष्ट हेतू ।।४७।। ऐसें ऐकून शिववचन । महासुर म्हणे हर्षोत्फुल्लनयन । भक्तीनें विनम्र होऊन। वरदा जरी वर देसी ।।४८।। तरी तुझी दृढ भक्ति । सदैव रहावी माझ्या चित्तीं । ब्रह्मांडाचें राज्य मजप्रति । लाभावें नाना ऐश्वर्ययुक्त ।।४९।। आरोग्यादींनी मी युक्त । असावें सदा तृप्त । व्हावे पुर्ण माझे मनोरथ त्वरित । अनुग्रहें आपुल्या ।।५०।। मनोवाणीमय जे असत । त्यापासून मृत्यू नसत । ऐसें वरदान मजप्रत । द्यावें सांप्रत कृपानिधे ।।५१।। लोभासुर म्हणे सदा आनंदयुक्त । ठेवावें मज अबाधित । ऐसें लोभासुराचें वचन ऐकत । तेव्हां चकित शिव झाला ।।५२।। परी तपोबळें बद्ध असत । तथास्तु ऐसें उच्चारित । तत्क्षणीं अन्तर्धान पावत। कैलासावरी परत गेला ।।५३।। लोभासुरही प्रसन्नचित्त । आपुल्या गृहासी परत जात । ऐसें हे आख्यान अद्भुत । मुद्गल सांगती दक्षासी ।।५४।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे चतुर्थे खंडे गजाननचरिते लोभासुरवरप्राप्तिवर्णनं नाम षट्त्रिंशोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय छत्तिसांवा संपूर्ण)